
# ८६ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन

## नांदेड

दि.२७,२८ आणि २९ जाने.२००६

अध्यक्षीय भाषण

# प्रा. दत्ता भगत



इये मराठीचिये नगरी ।
नाट्यविद्येचा सुकाळू करी ।।

**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद**

**मान्यवर मित्र हो,**

नांदेड येथील ८६ व्या.अ.भा.मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारतांना मी पुरेसा संकोचलो आहे. नाटक आणि रंगभूमी या संदर्भातला हा सर्वोच्च बहुमान आहे, असे मराठी माणूस मानत आला आहे. आणि असा हा बहुमान मिळावा, एवढे कोणतेही ऐतिहासिक कर्तृत्व माझ्या हातून घडलेले नाही. मागील ८५ अध्यक्षांची नावे वाचली, त्यांचे नाटक या क्षेत्रातले कर्तृत्व लक्षात घेतले; तेव्हा एक गोष्ट माझ्या लक्षात आली, मराठी नाटक आणि रंगभूमी यावर आस्थेने केवळ प्रेम करणाऱ्या काही व्यक्तींनाही अध्यक्षपद देण्याचे औदार्य मराठी नाट्यपरिषदेने दाखवले आहे. नाट्यपरिषदेच्या या औदार्यामुळे अध्यक्षपद स्वीकारण्याइतका दिलासा मला मिळाला. त्यामुळे नाट्यपरिषदेचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

नाट्यसंमेलनाचा इतिहास चाळल्यानंतर आणखीही एक गोष्ट माझ्या लक्षात आली. समीक्षक मानोत अगर न मानोत, कै.राम गणेश गडकरी हे स्वातंत्र्यपूर्व काळातले एक अतिशय महत्त्वाचे नाटककार आहेत. त्यांच्या हयातीत पुणे येथे दोन वेळेला नाट्यसंमेलन झाले. त्यांच्याच हयातीत पुणे येथे एकाच व्यक्तीला दोन वेळेला संमेलनाध्यक्षपद मिळाले. पण त्यांना मात्र संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले नाही. म्हणून इतिहासातल्या आणि वर्तमानातल्या अशा व्यक्ती ज्यांचा संमेलनाध्यक्ष म्हणून गौरव व्हावा असे मला स्वत:लाच वाटते, त्यांना अभिवादन करुन मी हे पद स्वीकारत आहे.

नाट्यसंमेलनाच्या इतिहासात मराठवाड्यात नाट्यसंमेलन झाले ते प्रथम नांदेड येथे, त्यानंतर परभणी येथे आणि आता नांदेडला. त्यामुळे मराठवाड्यातल्या नाट्य रसिकांना माझ्या निवडीचा विशेष आनंद झाला आहे. खरे तर माझ्याही आधी माझ्यापेक्षा अधिक कर्तृत्व असणाऱ्या मराठवाड्यातल्या व्यक्तींना हा सन्मान मिळायला हवा होता. औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगावच्या कै.लोटू पाटील यांची नाट्यक्षेत्रातली कामगिरी लक्षात घेतली तर आपणास थक्क व्हायला होते. त्यांनी स्थापन केलेल्या श्रीराम संगीत मंडळीचा शताब्दी महोत्सव नुकताच साजरा झाला. या प्रसंगी सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक श्री.जब्बार पटेल आणि प्रसिद्ध नाट्यकलावंत

मा.निळू फुले यांनी काढलेले गौरवोद्‌गार अजून ताजे आहेत. कै.लोटू पाटील यांनी स्वखर्चातून त्या काळच्या मापदंडाप्रमाणे या आडगावात नाट्यगृह बांधले आणि आपल्या गावातील सहकाऱ्यांना घेऊन नाटके तर बसवलीच, पण पुणे, मुंबई येथे पन्नास वर्षांपूर्वी गाजणाऱ्या सर्व संगीत नाटकांचे प्रयोग तेथील नाट्यसंघांना निमंत्रित करुन इथे दाखवली. अनेक नाट्यकलावंतांना त्यांच्या हलाखीच्या दिवसात कै.लोटू पाटील ह्यांनी आधार दिला. ते स्वत: एक उत्तम नट होते. अशा या नटाची आणि सोयगावच्या रंगभूमीची माहिती देणारे किमान लहानसे पुस्तक तरी आता पर्यंत लिहिले जायला हवे होते. दुसरे उदाहरण पाथरी येथील श्रीपाद नरसिंह बेंडे यांचे आहे. 'नाट्यमन्वंतर' या संस्थेने सादर केलेल्या कै.वर्तकांच्या 'आंधळ्याची शाळा' या अनुवादित नाटकाचा नाट्यवाङ्‌मयाच्या इतिहासात खूप बोलबाला होतो. पण श्रीपाद नरसिंह बेंडे यांचे 'बेबी' हे नाटक 'आंधळ्याची शाळा' या नाटकाच्या आधीचे. पुढच्या काही वर्षात शंभर प्रयोगांपर्यंत पुढे सरकलेले. आणि त्या काळातल्या पांढरपेशा मराठी माणसाच्या जीवनातल्या एका समस्येला सामोरे जाणारे नाटक म्हणून मान्यता पावलेले नाटक. 'आंधळ्याची शाळा' या नाटकाच्या संदर्भात संगीत आणि नेपथ्य या संदर्भात जे जे नवे प्रयोग केले गेले ते सर्व 'बेबी' या नाटकात आधीच केले गेले. एवढेच नाही तर हे नवे प्रयोग करणारे संगीत दिग्दर्शक आणि नेपथ्यकारही 'आंधळ्याची शाळा' या नाटकाचेच संगीत दिग्दर्शक होते. पण कै.बेंडे यांच्या कर्तृत्वाचीही फारशी कुणी नोंद घेतली नाही. माझे मित्र आणि मराठवाड्यातील एक ज्येष्ठ नाट्यलेखक डॉ.प्रियकर यशवंत जैन ह्यांनी बेंडे यांच्या स्मरणार्थ हिंगोली येथे बेंडे एकांकिका स्पर्धा सुरु केली नसती तर कदाचित बेंडे यांचे नावही इतिहासजमा झाले असते. या स्पर्धेमुळेच आमचे मित्र कै.भास्कर कुलकर्णी यांनी बेंडे यांचे अल्पसे चरित्र लिहिले आणि त्यांच्या तीन संहिता उपलब्ध करुन छापल्या. वर्षभरापूर्वीच डॉ.शर्मिष्ठा भगत ह्यांनी कै.श्रीपाद नरसिंह बेंडे यांच्या लेखनाचा व कार्याचा विस्तृत परामर्श घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात प्रबंध सादर केला. पण एवढे ऐतिहासिक कार्य करणाऱ्या बेंडे यांच्याही वाट्याला उपेक्षाच आली. आणि अगदी अलिकडच्या काळात गुरुवर्य कुरुंदकरांनी लिहिलेला 'रंगशाळा' हा भरतमुनींच्या नाट्यशास्त्रावरील ग्रंथ त्यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झाला. 'हिमालयाची सावली,' 'तुझे आहे तुजपाशी,' 'रायगडाला जेव्हा जाग येते,' 'सं.शारदा' इत्यादी नाटकांवरचे त्यांचे समीक्षा लेख बहुचर्चित राहिले. अशा या नाट्यसमीक्षकालाही अध्यक्षपदाचा हा बहुमान मिळाला नाही. तेव्हा मला अध्यक्षपद मिळाल्यानंतर जणू हा उपेक्षित मराठवाड्याचाच बहुमान आहे असे अनेकांना वाटले. माझ्या सत्कार समारंभात अनेकानी हे बोलून दाखवले. तेव्हा हे अध्यक्षपद मराठवाड्यातल्या ज्या अनेकांना मिळायला हवे होते, ज्यांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव व्हायला हवा होता, पण नाट्यवाङ्‌मयाच्या इतिहासात ज्यांच्या नावाचाही उल्लेख होत नाही,

अशा तमाम आदरणीय रंगकर्मींच्या वतीने मी या अध्यक्षपदाचा स्वीकार करीत आहे हे कृपया लक्षात घ्या.

माझ्या या अध्यक्षपदाचा आनंदात आणखी एक प्रवाह सामील झाला आहे. मी माझे बव्हंशी सर्व नाट्यलेखन दलितांच्या समस्यांवर लिहिले आहे. माझ्या सर्व पुस्तकांच्या अर्पणिका देखील या गोष्टीची साक्ष देतील. एवढेच नाही तर दलित रंगभूमीच्या संदर्भातही मी वेळोवेळी समीक्षा लेखन केले आणि माझ्या या सर्व लेखनामागे फुले, आंबेडकरी विचारांची प्रेरणा होती, हेही सर्वांना ठाऊक आहे. या चळवळीतल्या सहप्रवाशांनी मला अंबेजोगाई येथे झालेल्या अ.भा.दलित नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान दिलेला होता. मला आता अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाध्यक्षपद मिळाले याचा दलित रंगभूमीवरील सर्व कार्यकर्त्यांना, लेखकांना आणि रंगकर्मींना आनंद झाला आहे. म्हणूनच माझे हे पद मी या सर्व रंगकर्मींच्या वतीने स्वीकारतो आहे याचीही कृपया आपण नोंद घ्यावी, कारण मी या प्रवाहाचा एक प्रतिनिधी आहे.

इ.स.१९८६ साली झालेल्या माझ्या अध्यक्षीय भाषणात मी म.फुले यांना पहिले आधुनिक नाट्यलेखक म्हणून अभिवादन केले होते. म.फुले यांचे 'तृतीय रत्न' हे नाटक त्यावेळी मला नुकतेच उपलब्ध झाले होते. या दरम्यान मी म.फुले यांच्या या नाटकाचा सविस्तर परामर्श घेणारी प्रस्तावना लिहून हे नाटक मराठी वाचकांच्या हाती दिले आहे. म.फुले हे आद्य नाटककार आहेत हे माझे मत विवाद्य असू शकेल. आमचे ज्येष्ठ मित्र प्रा.त्र्यंबक महाजन संत एकनाथांना आद्य नाटककार मानतात. मी स्वत: एकनाथापासून पारंपरिक मराठी रंगभूमीचे स्वरुप अधोरेखित करता येईल असा रंगभूमीचा प्रवाह दिसून येतो असे मानतो. आणि या पारंपरिक रंगभूमीचा अखेरचा बिंदू कै.विष्णुदास भावे यांचे 'सीता स्वयंवर' हे नाटक आहे, असे मानतो. म्हणून आपल्या लेखनाला 'नाटक' या वाङ्मयप्रकाराचे नाव देणारे म.फुले हेच आद्य नाटककार आहेत, असे मला वाटते. निदान 'पहिले आधुनिक नाटककार' म्हणून तरी त्यांचा स्वीकार करायला हरकत नाही, असे मला वाटते. अर्थात हा चर्चेचा प्रश्न मी बाजूला ठेवतो आणि म.फुले ह्यांना अभिवादन करतो. नाट्यपरिषदेने मला हा बहुमान दिला त्यावेळी एक गोष्ट नकळत घडली. माझ्या दृष्टीने हा योगायोग अतिशय महत्त्वाचा आहे. म्हणून मी तो नमूद करण्याची संधी घेतो. 'तृतीय रत्न' या नाटकाच्या लेखनाला नुकतीच १५० वर्ष पूर्ण झाली आहेत आणि हे या नाटकाचे १५१ वे वर्ष आहे. हा योगायोग माझ्यासाठी तरी अतिशय आनंददायक आहे.

सामान्यपणे इतिहासातल्या कालिक नोंदी माणूस लक्षात ठेवत नाही. पण काही घटनात्मकनोंदी मात्र त्याच्या आयुष्यात अविस्मरणीय ठरतात. मी 'जयहिंद' झाले त्यावेळी तीन वर्षाचा होतो अशी घटनात्मक नोंद माझे आईवडील सांगत

असत. याच घटनात्मक नोंदीच्या आधारे मला माझा जन्म दिनांक मिळाला. माझ्या अध्यक्षपदाच्या स्मरणासाठी जागतिक पातळीवरील एक अशीच घटनात्मक नोंद माझ्या पुरती तरी महत्त्वाची ठरणार आहे. यावर्षीचा नोबेलपुरस्कार हॅरॉल्ड पिंटर या नाटककाराला मिळाला आहे. जागतिकीकरणाच्या आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या पार्श्वभूमीवर या नाटककाराचा गौरव होतो आहे ही घटना माझे मानसिक बळ वाढवणारी आहे. नांदेड बाहेर फारसे कुणाला माहीत नसेल, पण याच नाटककाराच्या 'केअर टेकर' या नाटकाचा अनुवाद माझे मित्र डॉ.एल.एस.देशपांडे ह्यांनी केला आणि नांदेडच्या नाट्यकलावंतांनी त्याच नावाने तो सादर केला होता. एका बाजूला संगीत नाटकाची नऊ पारितोषिके आणणाऱ्या नांदेडकर नाट्यकलावंतांची अत्याधुनिक नाट्यलेखनाशीही कशी नाळ जुळलेली होती हे आपल्या लक्षात आणून देताना मला खूप आनंद होतो आहे.

मित्र हो, राजकीय सत्ता हे एक मौलिक साधन असतं. माझं हे विधान आजच्या परिस्थितीत कुणालाही पटणार नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या संघर्षाचा आपण उलगडा कसा करणार ? आणि आपल्या देशातल्या हौतात्म्य पत्करणाऱ्या क्रांतीकारकांचा जीवनपट तरी आपण कसा समजून घेणार ? न्यायासाठी महाराज जेव्हा रक्तसंबंधी नातलगाचे हातपाय अत्यंत निष्ठूरपणे तोडण्याचे आदेश देतात तेव्हा सत्तेचं मोल काय असतं हे आपणाला कळतं. हे मोल हरवलं की सत्तास्पर्धेत उरते ती भाऊबंदकी. महाभारतातलं युद्ध आपल्यासमोर आहे. कौरवांचा नि:पात करताना ज्यांच्या जगण्यासाठी तो करायचा ते पांडवही एकामागून एक संपले की येणारं एकाकीपण आणि वैफल्य किती भयानक असू शकतं याचं विदारक चित्रण व्यास करतो. आपल्या सारख्या प्रेक्षकांना ह्यानंतर प्रश्न पडतो असंच जर होणार असेल तर आपण कोणता संदेश घ्यायचा ? जगाकडे पाठ फिरवण्याचा ? पण आपण जगाकडे पाठ फिरवली तर जगाचं वाहतेपण थांबतं थोडंच ? जगातले सगळे विकारयुक्त व्यवहारही शिल्लक दिसू लागतात. सत्तेच्या साठमारीला कंटाळून पाठ फिरवायची ? की ज्यांच्यासाठी सत्ता हवी त्यांचा आणि न्यायाचा मुडदा पडला तरी चालेल पण मी विरोधकांना लोळवणारच, त्यासाठी माझा कडेलोट झाला तरी चालेल या टोकापर्यंत येऊन पोचायचं ?

आपणाला सत्ता हवी, पण न्यायाचं अधिष्ठान असणारी. जीवांना इजा न करता त्यांच्या जीवितात बदल घवून आणणारी, असा सम्यकत्वाचा संदेश ज्यांनी आम्हाला दिला त्या सिद्धार्थ गौतमबुद्धाचा हा देश आणि प्रत्ययाच्या पातळीवर ज्यांनी हा संस्कार रुजवला त्या महाकवी व्यासाचा हा देश आहे.

इ.स.१८५० ते १९५० या शंभरवर्षाच्या काळात ज्यांनी न्यायाच्या भूमिकेला समतेच्या तेजाबात घासून पुसून काढलं, ज्यांनी ज्यांनी न्याय देवतेच्या शरीरावरची गुलामीची आभूषणं ओरबाडून काढली आणि सामान्य माणसांची या

देवतेशी भेट घडवून आणली, प्रसंगी त्यासाठी हौतात्म्यही पत्करलं, त्या, सर्वांनाच मी प्रथम अभिवादन करतो. न्याय, स्वातंत्र्य आणि समतेचं एकात्म महामूल्य आमच्या जीवनशैलीला अधिष्ठान म्हणून लाभलेलं असल्यामुळं आपल्या सगळ्यांच्याच कृतीउक्तीत अनवधानानं अथवा हेतुत: जे जे उगवतं ते नीट समजून घेण्याची, नाटक या वाङ्मय प्रकारातला एक लेखक या नात्यानं आपल्यावर जवाबदारी आहे असं जे मानतात, त्यांचा प्रतिनिधी म्हणून मला काही बोलायचं आहे. माझ्या भूमिकेचा कुणी विपर्यास करु नये एवढीच माझी आज अपेक्षा.

मित्र हो, मी लेखनाला आरंभ केला तेव्हा कै.वसंत कानेटकर आणि कै.वि.वा.शिरवाडकर यांचं युग चालू होतं. नाटक कसं असतं याची धूसर कल्पना मनात साठवून घेण्याचा हा माझा काळ होता. पण विजय तेंडुलकर यांचं नाटक वाचताना हा माणूस माझ्या युगाचं नाटक लिहीत आहे हे जाणवू लागलं होतं. महेश एलकुंचवार यांच्या एकांकिका वाचताना माझ्या अवतीभवतीचं माझं आपलंसं काही या नाटकात प्रकट होत आहे याची जाणीव होऊ लागली होती आणि सतीश आळेकरांच्या 'महानिर्वाण' या नाटकानं मला पुरतं अंतर्मुख केलं होतं. मी नकळतपणे माझी रंगभाषा शोधण्यासाठी तेंडुलकर, एलकुंचवार आणि आळेकर यांची वाट ही आपली वाट आहे असे मानू लागलो होतो. पण माझे प्रश्न निराळे होते आणि माझ्या प्रश्नांचे संदर्भही निराळे होते. त्यामुळं तेंडुलकर, एलकुंचवार आणि आळेकर यांचं नाटक मला माझ्या 'युगाचं' वाटत होतं, तरी पण ते मला 'माझं' वाटत नव्हतं. ज्या दलित साहित्यानं मला मी सापडत होतो तसा या नाटकांतून माझा मीच मला दिसत नव्हतो. तरी पण माझ्या दु:खाचं आशयात्मक निराळेपण प्रकट करण्यासाठी तेंडुलकर, एलकुंचवार आणि आळेकर यांची रंगभाषा मला माझी वाटत होती. पुढे मी जलसे वाचले, कै.अण्णाभाऊ वाचले आणि 'युगयात्रा' वाचले. समकालीन दलित साहित्यामुळे एक नवं भान येत गेलं. अध्यापनाच्या निमित्तानं म.फुले यांचे 'तृतीय रत्न' वाचलं आणि मला माझी वाट सापडली. तेव्हा रंगभूमीच्या या वाटेवर ज्यांनी ज्यांनी मला आणून पोचवलं त्या सर्वांचा मी ऋणी आहे. आशय माझ्या दु:खाचा, दृष्टी म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची, वाट तेंडुलकर, एलकुंचवार, आळेकरांची असा माझ्या लेखनाचा आरंभ होता. माझ्या प्रमाणं अनेक शहरांमधून वेगवेगळ्या वाटेनं जाणारे पण माझा आशय प्रकट करणारे अनेक सहप्रवासी दिसू लागले. ज्येष्ठ रंगकर्मी भि.शि.शिंदे यांनी तर आम्हा सगळ्यांना एकत्र आणलं. आता मी एकटा नव्हतो. अख्खं एक युग माझ्या साथीला आहे असा आत्मविश्वास मला आला. आणि थिएटर अकादमीनं तर माझ्या या आत्मविश्वासाला मराठी रंगभूमीवर ज्यांचं महत्त्वपूर्ण स्थान आहे अशा एका समूहासमोरच अभिव्यक्त होण्याची संधी दिली. या सर्वांचा माझ्या नाट्यलेखनात जो वाटा आहे, त्याबद्दलची कृतज्ञता मी प्रथम व्यक्त करतो.

माझ्या आतापर्यंतच्या प्रास्ताविकातच काही चर्चा होईल असे मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्याकडे मी प्रथम वळतो. प्रास्ताविकात उपस्थित झालेला पहिला मुद्दा आद्य नाट्य लेखकाचा आहे.

गेल्या शेदीडशे वर्षात आणि विशेषत: स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात समाजातले अनेक स्तर जागे झाले. त्यांच्या चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळींचे मध्यवर्ती प्रश्न वर्तमानातले आहेत. पण चळवळीची तीव्रता वाढवताना सगळे जेव्हा इतिहासातून पाठबळ मिळवतात, तेव्हा ज्ञानक्षेत्रातील प्रश्न आणि वर्तमानातील प्रश्न यांची गल्लत होऊ लागते. नुकतीच जाग येऊ लागलेल्या समूहांच्या चळवळीत ही गल्लत, कधी अनवधानाने होते तर कधी ज्यांच्या सत्तेचा संकोच होतो आहे त्यांच्याकडून ही गल्लत जाणीवपूर्वक होते. अशा वेळी शिक्षक या नात्यानं अशा सीमारेषा दाखवून देणं मला आवश्यक वाटतं. मराठीतला आद्य नाटककार कोण या प्रश्नाची चर्चा होताना कुणाला तरी हा प्रश्न आपले वर्तमानातले सांस्कृतिक महत्त्व नाकारणारा वाटतो तर कुणाला हा प्रश्न इतिहासातले आपले कर्तृत्व नाकारणारा वाटतो. अशा प्रश्नांच्या आधारे ज्यांना लढाया करायच्या आहेत त्यांना एक रंगकर्मी म्हणून आपण अडवणार कसे ? अशा वेळी आपण शांतपणे हे सांगायला हवं की आद्य नाट्यलेखक कोण हे आपण नंतर ठरवू; पण नाटकाच्या क्षेत्रात ज्याला आपण 'आधुनिक' हे विशेषण लावतो त्याच्या कसोट्या कोणत्या, यावर चर्चा करु. ही चर्चा अधिकाधिक वस्तुनिष्ठ व पूर्वग्रहरहित होणे मग शक्य आहे. कारण आपण सर्वच 'आधुनिकतेच्या' दिशेनं वाटचाल करीत आहोत यावर आपले फारसे मतभेद नाहीत. त्यामुळं आधुनिकता ठरवणाऱ्या किमान कसोट्या निश्चित झाल्या तर या वादातील पूर्वग्रहांची वादळं थांबू शकतील. मी म.फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकाला पहिले आधुनिक नाटक आहे असे मत प्रकट केले, तेव्हा 'आधुनिकत्व' ठरवणाऱ्या कसोट्या कोणत्या असू शकतात यावर माझे लक्ष केन्द्रित केले.

एखाद्या नाटकाचे आद्यत्व हे संहितेऐवजी त्या नाटकाचा प्रयोग केव्हा झाला या आधारे ठरवायचे असेल तर आद्यत्वाचा मान कदाचित विष्णुदास भावे ह्यांना द्यावा लागेल. रंगकर्मी आणि संहिता लेखक यांच्यातील एका सूक्ष्म मतभेदाकडे मी आपले इथेच लक्ष वेधू इच्छितो.

मला हे मान्य आहे की स्टॅनिस्लाव्हस्की यांच्या सिद्धांतानंतर नाटकाच्या माध्यमाकडं पाहण्याचा आपला दृष्टिकोन आमूलाग्र बदलला. निर्मिती आणि नटाची भावाविष्कृती या दोन स्वतंत्र कला आहेत, त्यांची माध्यमं वेगवेगळी आहेत, या त्यांच्या सिद्धांतामुळं नट हा सृजनशील कलावंत ठरला. 'टोटल इम्पॅक्टला' महत्त्व मिळाले. आणि याच सिद्धांतातून पुढे 'इब्सेनियन थिएटर' जन्माला आले. पण पाश्चात्य सैद्धांतिकांचे विवेचन अनेक वेळेला इतक्या विपर्यस्त स्वरुपात आपण स्वीकारतो की त्यामुळे मूळ सिद्धांतामागील त्या विचारवंताच्या भूमिकेचाच आपणाला

विसर पडतो आहे असे मला जाणवते. रंगभूमीवरच्या इम्प्रोव्हायझेशनलाच नाटक म्हणावे इथपर्यंत मग विपर्यास होऊ लागतो. मला तर काही रंगकर्मी असे भेटले की त्यांनी संहितेविना नाटक संभवते इथपर्यंत आपले म्हणणे ताणले. अगदी थिय्याम अथवा कन्हैय्यालाल स्कूलचे नाटक घेतले तरी तिथे संहितेचा अभाव आहे असे म्हणता येत नाही. केवळ पुणे-मुंबई अथवा त्या खालोखाल असणारी काही शहरेच फक्त नाटकाच्या संदर्भात विचारात घ्यायला हवीत असे मला वाटत नाही. युवक महोत्सव आणि विविध नाट्यस्पर्धा यांचाही विचार करायला हवा. सांघिक कसरतीशिवाय नाटकाला पारितोषिक मिळत नाही असा एक चुकीचा संदेश आज तरी आपण केलेल्या चर्चेतून तिथे पोचला आहे. मी भास, कालिदास अथवा भवभूती यांचे नाटक पाहिले नाही की हॅरॉल्ड पिंटर यांचेही नाटक पाहिले नाही. पण रंगभूमीचा विचार करताना संहिताकेंद्री विचार कालबाह्य झाला आहे असे मात्र मला मुळीच वाटत नाही. रंगभूमीवरील रंगसंकेत अंगवळणी न पडलेल्या प्रेक्षकांसमोर माझ्या 'आवर्त' चा प्रयोग झाला आणि नको तो अर्थ जेव्हा ग्रामीण भागातल्या प्रेक्षकांनी लावला; तेव्हा 'वाटा पळवाटा' हे नाटक लिहिताना मला जाणीवपूर्वक बाळबोध वळणाच्या कौटुंबिक नाट्यतंत्राचा वापर करावा लागला. मी चळवळीतला नाट्यलेखक असल्यामुळं मला हे करणं अधिक गरजेचं वाटलं.

'नाटक' या नियतकालिकात 'अधांतर' नाटकाच्या निर्मितीवर समर्थ लेखक श्री जयंत पवार यांची एक दीर्घ मुलाखत आली आहे. त्यात त्यांनी नरुच्या तोंडी आलेली शिवी लिहून तर टाकली पण त्यानंतरची जी घालमेल त्यांनी सांगितली आहे, ती लक्षात घेतली तर रंगभाषेतील शब्द माध्यमाचा एखादा लेखक किती सूक्ष्मतेने विचार करतो, हे आपल्या लक्षात येऊ शकते. डॉ.लागूंनी याच अंकातील एका मुलाखतीत 'नाटककार, निर्माता, दिग्दर्शक, रंगभूषाकार, नटांचा संच मिळून एक संघ होतो आणि त्यातून नाटक उभं राहतं,' असं सांगताना 'अरे पण तुम्ही ज्यांच्या समोर करता तो प्रेक्षक त्या संघाचा घटक नाही का ?' असा प्रश्नही विचारला आहे. प्रेक्षकांकडं दुर्लक्ष करणं हे चळवळीतल्या लेखकाला तर मुळीच परवडणारे नाही, असे मला वाटते. 'ऑडियन्स ट्रेनिंग' हा जो प्रकार आम्ही करायला पाहिजे होता, ज्या जाणीवेने आम्ही पंचावन्न सालापासून नाटक करत आलो, ती जाणीव लोकांपर्यंत पोचवण्याचा सुद्धा प्रयत्न केला नाही, वैचारिक पातळीवर (असा प्रयत्न) करायला पाहिजे होता' अशी खंत आयुष्याच्या उत्तरार्धात डॉ.लागू यांच्यासारख्या समर्थ कलावंतानं प्रकट केली आहे. या त्यांच्या चिंतनाचा सर्वच रंगकर्मींनी गंभीरपणे विचार करायला हवा असं मला वाटतं. असा कुठलाही प्रयत्न आज जाणीवपूर्वक होताना दिसत नाही. प्रेमानंद गज्वी, डॉ.सुरेश मेश्राम, अशोक हंडोरे आणि त्यांचे सहकारी मित्र ह्यांनी अगदी अलीकडे 'बोधी' या नाट्यसंस्थेच्या वतीने नाट्यवाचन कार्यशाळा आयोजित करण्याचा उपक्रम सुरु केला आहे. या

उपक्रमाच्या माध्यमातून शब्दनिष्ठ संहिता आणि शब्दांपलीकडे असणारी रंगभाषा यातील संबंध कशा स्वरुपाचे असतात या विषयी चर्चा होते. यातील काही नाट्यवाचन कार्यशाळेत सर्वश्री कमलाकर नाडकर्णी, रामनाथ चव्हाण, अतुल पेठे, मंगेश पदकी, राजीव नाईक, कुमार अनिल यासारखी मंडळीही उपस्थित होती. हा प्रयत्न अत्यंत क्षीण आहे. पण नवनव्या लेखकाचा शोध घेणे आणि आपला प्रेक्षक जाणीवपूर्वक घडवणे यासाठी हा उपक्रम स्तुत्य आहे, असे मला वाटते. राज्य नाट्यस्पर्धांमध्ये, बक्षिसपात्र ठरणाऱ्या नाटकांचे वाचन ठेऊन हा उपक्रम अधिक व्यापक करता येणे शक्य होईल असे मला वाटते. यातूनच कदाचित प्रयोगनिष्ठ समीक्षाही लिहिली जाईल आणि संहिता व प्रयोग यांचे नीट आकलन असणारा एक प्रेक्षक वर्ग तयार होईल असे मला वाटते.

म.फुले यांना पहिले आधुनिक नाटककार मानावे की मानू नये या मुद्यापासून सुरु झालेली चर्चा नाटक म्हणजे काय ? हे जाणणारा प्रेक्षकवर्ग कसा घडवता येईल आणि तो घडवणे किती आवश्यक आहे इथपर्यंत येऊन पोचली.

माझ्या प्रास्ताविकातला दुसरा मुद्दा म्हणजे रंगभूमीच्या मध्यवर्ती प्रवाहाविरुद्ध आम्ही बंड पुकारले होते, अशा अवस्थेत मध्यवर्ती रंगभूमीने मला देऊ केलेले हे पद स्वीकारतांना मी माझ्या भूमिकेशी द्रोह केला आहे का ? गेल्या दोन महिन्यापासून मी ठिकठिकाणी सत्कार घेतले. पण असा प्रश्न मला कुणी विचारला नाही. याचा अर्थ असा प्रश्न विचारलाच जाऊ शकत नसतो असे मात्र नाही. विविध ठिकाणी झालेल्या सत्कार समारंभापैकी नागपूर येथील माझा सत्कार या संदर्भात अधिक महत्त्वाचा आहे असे मी मानतो. दलित समस्या केन्द्रस्थानी ठेवून सतत प्रयोग करणाऱ्या नाट्यसंस्था नागपूर येथे जास्तीत जास्त आहेत. त्यापैकी अनेक संस्था या सत्कारात सहभागी झाल्या. 'दखल सामाजिक सांस्कृतिक' संघटनेने हा सत्कार घडवून आणण्यात पुढाकार घेतला. आयु-कमल वाघधरे आणि सौ.तक्षशीला वाघधरे हे रंगकर्मी पुढाकारात होते. इ.मा.नारनवरे, ॲड.विजय वाघमारे, वीरेन्द्र गणवीर, लोकनाथ यशवंत, किरण मेश्राम, इसा दास भडके, प्रा.अशोक गोडघाटे, जिंदा भगत, डॉ.रमेश जनबंधू, उमाकांत सोनटक्के असे अनेक कलावंत आपापल्या संस्थेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. एवढेच नाही तर सर्वश्री महेश एलकुंचवार, संजय पवार, एकनाथराव साळवे आणि गिरीश गांधी या वेगवेगळ्या प्रवाहातील मान्यवरांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. सदर कार्यक्रम नागपूर येथील सांस्कृतिक चळवळींचे आधारस्तंभ आयु.ताराचंद खांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यातील एखाददुसरा अपवाद वगळला तर बव्हंशी सर्व रंगकर्मी फुले-आंबेडकर चळवळीशी बांधील आहेत. या सर्वांनीच मी हे पद स्वीकारले आणि अ.भा.मराठी नाट्य-परिषदेने हे पद मला देऊ केले, याचा आनंदच व्यक्त केला. असे असूनही मी वरील प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रश्नाची भाषा अरुचकर

आहे. पण हा प्रश्न उपस्थित करणे आवश्यक आहे, असे मला वाटते. असो, हाच प्रश्न मी आता ॲकॅडेमिक भाषेत उपस्थित करतो. दलित रंगभूमी आणि मराठी रंगभूमी यांचे नाते काय ? सामान्यपणे मध्यवर्ती रंगभूमी म्हटले की स्वातंत्र्यपूर्व काळातील व्यावसायिक रंगभूमीच आपल्या डोळ्यासमोर येते. स्वातंत्र्योत्तर काळात व्यावसायिक नाटकांबरोबर प्रायोगिक नाटके उदयाला आली. या दोन्ही प्रवाहांची मिळून मध्यवर्ती मराठी रंगभूमीने ओळख सिद्ध केली. व्यावसायिक रंगभूमीबद्दल ती रंजन करते हा आक्षेप कधीच नव्हता. विष्णुदास भावे यांच्यापासून तो आजपर्यंत व्यावसायिक रंगभूमी रंजनाला प्राधान्य देत आली आहे. रंजना बरोबरच प्रेक्षकांना एखादा संदेश देऊन त्यांचे उद्‌बोधन करावे हाही एक विशेष या रंगभूमीचा होता. याही विशेषाबद्दल तक्रार करावी असे काही नव्हते. पण या नाटकांमधून जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडले नाही. म्हणून ही नाटके मानदंड म्हणून स्वीकारली पाहिजेत, या आग्रहाबद्दल दलित रंगभूमीने आक्षेप घेतले आहेत.

पहिले उदाहरण 'सौभद्र' या नाटकाचे घेऊ. यातील संगीताने रंजनाची बाजू सांभाळली. दोन भावांमधील कृतक संघर्ष उभा करीत भावाभावांचे परस्पराशी नाते कसे असावे हा संदेश दिला आणि आता नजीकच्या वर्तमानात प्रेमविवाहाला मान्यता द्यावी लागेल याचे सूचन केले. अर्थात हे सूचन इतके सावध होते की, लेखकाला कुणी जवाबदार धरु शकत नव्हते. बदलत्या मूल्यांचा प्रश्न कुणी उपस्थित केलाच तर ती श्रीकृष्णाची पौराणिक कथा आहे हे सांगून मोकळे होता येईल याची लेखकाला सोय होती. दुसरे 'शारदा' हे नाटक बालाजरठ विवाहाची समस्या असलेले नाटक. खरे तर बालाजरठ विवाहाची समस्या सुरुच होते, ती या विवाहानंतर. पण 'शारदा' या नाटकात असा विवाहच होत नाही. ७५ वर्षाचा बीजवर लग्नाला उभा राहिला की तोच विनोदाचा विषय होतो. पुढे असे विवाह होऊ नयेत यासाठी साक्षात शंकराचार्यांनाच आशीर्वादासाठी निमंत्रित करुन शारदा व कोदंडचा विवाह लावून दिला आहे. समस्येला मुळीच स्पर्श न करता 'शारदा' हे बालाजरठ विवाहाच्या समस्येवरील नाटक मानायचे हे मात्र सतत सांगितले गेले. स्वातंत्र्याची चळवळ असो की समाजसुधारणेची, आमची धर्मपीठे नेहमीच या चळवळींपासून तटस्थ राहिली. असे असूनही शंकराचार्यांना रंगभूमीवर आणून विशफूल थिंकिंगच्या पद्धतीने रसिकांचे उद्‌बोधन करण्याचा खोटा आभास निर्माण केला जातो. 'लग्नाची बेडी' या नाटकाने तर व्यक्ती स्वातंत्र्याचा आभासही निर्माण केला आणि लग्न हा पारंपरिक संस्कार कसा आहे हाही संदेश दिला. नवरा आपल्या चारित्र्याचा संशय घेतो म्हणून पतीविरुद्ध बंड करणारी भानुमती घर सोडून जाते कुठे ? तर आपण 'कुलवधू' आहोत या विषयी खात्री असणाऱ्या आपल्या सासऱ्याकडे. त्यामुळे भानुमतीने विद्रोह केला हा स्त्री स्वातंत्र्याचा आभासही निर्माण करता आला आणि सासऱ्याच्या घरी आश्रयाला गेल्यामुळे परंपरेची मनोवृत्ती असलेला प्रेक्षकही सुखावला. अशी ही

व्यावसायिक नाटके, उत्तम रंजन करतात, त्या त्या वेळच्या मराठी प्रेक्षकांचे उद्बोधनही करतात. पण ही नाटके जीवनातल्या खऱ्याखुऱ्या समस्यांना भिडण्याऐवजी आपल्या प्रेक्षकांना रुचेल तेवढा समस्येचा आभास निर्माण करतात ही खरी दलित रंगभूमीची व्यावसायिक रंगभूमी बद्दल तक्रार होती. प्रायोगिक रंगभूमीने समस्यांना हात घातला. पण मध्यमवर्गीयांपुरत्या सीमित प्रश्नांनाच सामोरे जाणे पसंत केले. पण भूमिका मात्र, हे तमाम मराठी माणसाचे चित्रण करणारे नाटक आहे अशी घेतली. याहीविरुद्ध दलित रंगभूमीने आक्षेप घेतला. नट, निर्माता, दिग्दर्शक आणि प्रेक्षक या सर्वच स्तरांवर मध्यवर्गीय अभिजनवर्गच या रंगभूमीवर वावरत राहिला हा तिसरा आक्षेप दलित रंगभूमीने घेतला. १९६० नंतर विविध रेषांवरील सामाजिक स्तर नव्या जाणीवेनं जागृत झाले पण त्यांचे चित्रण मात्र मराठी रंगभूमीवर आले नाही असे या तक्रारीचे स्वरुप होते. आयु.भि.शि.शिंदे यांनी 'काळोखाच्या गर्भात' हे नाटक लिहून प्रथमच गावकुसाबाहेरचे दाहक वास्तव मराठी रंगभूमीवर आणले. दलित रंगभूमीचे निराळेपण आशयात्मक आहे, जीवनातील प्रश्नांकडे पहाण्याच्या आगळ्या वेगळ्या जीवनदृष्टीत आहे असे दलित रंगभूमीचे अथवा चळवळीच्या रंगभूमीचे प्रतिपादन होते. याचा अर्थ दलित रंगभूमीची चळवळ मराठी रंगभूमीच्या मर्यादांविरुद्ध होती. दलित रंगभूमी आणि मध्यवर्ती रंगभूमी यातील ही भेदरेषा लक्षात घेतली, म्हणजे दलित रंगभूमी आणि मध्यवर्ती मराठी रंगभूमीचे नाते समजून घेता येते. तेव्हा दलित रंगभूमीच्या प्रवाहातील लेखकाला अध्यक्षपद देऊन सन्मानित केले म्हणजे दलित रंगभूमीची चळवळ संपेल का ? कुणा एखाद्या लेखकाला मानसन्मान मिळावा यासाठी ही चळवळ सुरुच झाली नव्हती. मग असा मानसन्मान मिळाला तर ती चळवळ संपेल असं गृहीत धरणं हेच मुळी चूक आहे. मग नाट्य व्यवहारात असं घडलं तर त्याचे काय परिणाम होतात ? आपण परस्परांना समजून घेण्याचा आरंभ तरी करु असा संदेश हे अध्यक्षपद देतं असं मला वाटतं. म्हणून हे अध्यक्षपद एखाद्या चळवळीशी द्रोह नसून एका नव्या आंरभाचं ठिकाण आहे असं मी मानतो आणि हे असले आरंभ मराठी रंगभूमीच्या एकूण समृद्धीसाठी केव्हा ना केव्हा तरी व्हायला हवेत असं मी मानतो.

मित्र हो, या नंतर मी नाट्यलेखन व्यवहाराकडे वळतो. इथून पुढचे सर्व विवेचन माझ्या निरीक्षणावर आधारलेले आहे. त्यामुळं माझ्या निरीक्षणाला माझ्या सीमित अनुभवाच्या मर्यादाआहेत याचीही मला जाणीव आहे. तरी पण चळवळीतला लेखक या नात्याने मला माझी निरीक्षणं नोंदवायची आहेत.

नाट्यलेखनाची कच्ची सामग्री म्हणजे लेखकाचे आकलन आणि अवलोकन. आपल्या सभोवती घडणाऱ्या घटनांचे, वास्तवाचे लेखक आपल्या कुवतीप्रमाणे आकलन अवलोकन करतो. पण सर्वच घटना आणि त्याला जाणवलेले सगळेच वास्तव त्याच्या आकलन अवलोकनाचा विषय होत नसते. त्याला त्याच्या दृष्टीने

अस्वस्थ करणाऱ्या गोष्टींचेच तो आकलन अवलोकन करतो. ही त्याची दृष्टी म्हणजे त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन.

आकलन, अवलोकन आणि लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन या तिन्ही गोष्टी परस्पराश्रयी असतात. या तिन्ही गोष्टी परस्परांना समृद्ध करीत नेतात, विकास घडवीत नेतात किंवा कधी कधी एकमेकींचा संकोच करीत नेतात. हे मी उदाहरण देऊन स्पष्ट करतो.

मध्यमवर्गीय समाजाबाहेर मराठी माणसाचा एक खूप मोठा समूह होता आणि त्याची सुखदु:खं मध्यमवर्गीयांपेक्षा वेगळी होती. आजही आहेत. पण ही सुखदु:खं खाडिलकर-रांगणेकर यांच्या अवलोकनाच्या कक्षेत आली नाहीत. हरी नारायण आपटे यांच्या कादंबरीत आली नाहीत. याचा परिणाम काय झाला? प्रत्येक विधवा झालेल्या हिंदू स्त्रीला केशवपन करावेच लागते ह्यामुळे अस्वस्थ होणाऱ्या हरी नारायण ह्यांनाही मुळीच केशवपन न करता, वैधव्यानंतर दुसरा विवाह करणाऱ्या आणि तरीही हिंदू म्हणून जगणाऱ्या अनेक स्त्रिया आपल्या अवतीभवती आहेत हे दिसलेच नाही. परिणामी त्यांच्या या आकलनाला त्यांच्या अवलोकनाचीच एक मर्यादा पडली. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बहिणीला प्रवेश नाकारताना 'हिमालयाला' ही घाम फुटलाच असेल ! पण हा घाम पाहण्याचे धैर्य कानेटकरांनी दाखवले नाही. त्यामुळे महर्षिंना आव्हान देणाऱ्या गोष्टी समोर आल्यानंतर त्यांचे व्यक्तिमत्व उजळून निघाले की परिस्थितीशरण झाले हे नाटकात यायचे राहूनच गेले. गावकुसाबाहेर राहणाऱ्या जन्मदलितांना सवर्ण गुलामासारखे वागवतात याचे सूक्ष्म अवलोकन दलित लेखनात आले. पण एवढ्या गुलामीत गेल्या दोन हजार वर्षांपासून जगत आलेला जन्मदलितांचा समाज ते गाव सोडून न जाता ह्याच गुलामी लादणाऱ्या समूहाबरोबर का वागत आला याचे आकलन करायला हवे असे दलित लेखकाला फारसे वाटले नाही. तसे झाले असते तर त्याच्या अवलोकनाचे क्षेत्र अधिकच विस्तारले असते. याला प्र.ई.सोनकांबळे यांच्या सारख्याचा एखादा अपवाद असतो.

सारांश आकलन आणि अवलोकन या परस्पराश्रयी असणाऱ्या गोष्टी परस्परांना समृद्ध करु लागतात. तसेच परस्परांचा संकोचही करु शकतात, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. लेखकाने आपले अवलोकन-आकलन आपल्या जीवनविषयक दृष्टिकोनाने मर्यादित करता कामा नये. आपला समाज जातीजातींचा बनलेला असल्यामुळे आपल्या या दृष्टिकोनाला इतक्या मर्यादा आहेत की, त्यामुळे लेखक म्हणून समृद्ध होणे आपण नकळतपणे स्वत:च नाकारत जातो. दुदैवाने 'प्रतिभा' नावाच्या दैवी शक्तीने तर आमच्या लेखकाला फारच पंगू करुन टाकले आहे. गेल्या दोन हजार वर्षापासून आपल्याकडे 'प्रतिभा' नावाच्या दैवी शक्तीचा विचार होत आला आहे. लेखक कवी दुर्मिळ असतात. ते असे दुर्मिळ का ? या प्रश्नाचे उत्तर कदाचित जुन्या जगामध्ये दिले जाताना लेखकाजवळ 'प्रतिभा' नावाची

दैवी शक्ती असते असे कुणा विचारवंताला सुचले असावे. पण आपली जन्मसिद्ध श्रेष्ठता टिकवण्यासाठी प्रतिभाशक्तीचे सर्व लेखक कवींनी बरेच राजकारण मात्र केले. We are born equal. पण पुढे Some are born more equal हे गृहीत धरल्याशिवाय प्रतिभाशक्तीचे अस्तित्व मान्य करता येणार नाही. एखाद्या लेखकाला कविता सुचते कशी ? दैवी शक्ती असलेल्या प्रतिभेच्या जोरावर ! हे उत्तर दिले तर एखाद्या शास्त्रज्ञाला एखादे संशोधन सुचते कसे याचे तरी उत्तर काय देणार ? खरे तर लोकांना फसवण्यासाठी मुद्रांक घोटाळा करणारा पण त्याला सुध्दा नेमके हे सुचले कसे असा कुतुहल निर्माण करणारा प्रश्न तेलगीबद्दल आपल्या मनात निर्माण होऊ शकतो. संख्येने दुर्मिळ असणाऱ्या गुन्हेगाराजवळही 'प्रतिभा' नावाची दैवी शक्ती असते असे समजायचे का ? आता हे फारच भयंकर वाटत असेल तर शब्द बदलून घेऊ. गुन्हेगाराजवळ असुरी शक्ती असते आणि ती दैवीच असते असे मानायचे की काय ? म्हणून लेखकाच्या मनोवृत्तीचा कल, कौशल्य आणि ध्यास यातून तयार होणारा त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन हाच त्याच्या आकलन अवलोकनाला अभिव्यक्ती पर्यंत पोचवत असतो, आणि यातून जे गवसले ते त्याला शब्दबद्ध करावे अशी उत्कट इच्छा होते. त्याचा प्रतिभाशक्तीशी काहीही संबंध नाही.

लेखकाचे कुटुंब, त्याच्या अवतीभवतीचे पर्यावरण ह्यातून त्याचा कल तयार होतो, त्याच्या अवतीभवती असणारा उपजत शहाणपणाचा वारसा, त्याच्या ठिकाणी असणारे कुतुहल यातून त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन तयार होत जातो. त्याचे कुतुहलच त्याला आपले अवलोकन विस्तारत नेऊ शकेल असे त्याकडे ओढत नेते. आणि त्यामुळेच त्याचे आकलनही सखोल होत जाते. म्हणून आपले आकलन अवलोकन सीमित होऊ नये याची आपण काळजी घ्यायला हवी. कधीकधी हे औदार्य आपणाला महागात पडते. महागात पडते याचा अर्थ आपल्याच समजुती चुकत गेल्या आहेत, हे आपणाला जाणवू लागते. पण हे सहन करणे अवघड जाते. शरणकुमार लिंबाळे अथवा नारायण सुर्वे यांनी आपापल्या आईविषयी जे लिहून ठेवले आहे ते आपण वाचलेच आहे. कुंती हीच आपली आई आहे हे कळल्यानंतर कर्णाच्या मनातला आक्रोश व्यासांनीही रंगवला आणि शिरवाडकरांनीही चित्रित केला. पण या आक्रोशात कुंती विषयीच्या रागाचा आणि तिरस्काराचा टोचणारा एक तीव्र पदर आहे. तो शिरवाडकरांनाही वगळता आला नाही. पण सुर्वे आणि लिंबाळे यांच्या मनात आपल्या आईविषयी अफाट करुणा आहे. ती असं वागली, कारण तिच्यावर ज्या अवस्थेनं सक्ती केली त्या अवस्थेविरुद्ध संताप आणि चीड त्यांच्या लेखनात व्यक्त होते. कवी लेखकाचा असा हा त्यांच्या दृष्टिकोन आकलनाला कसे वेगवेगळे वळण देऊ शकतो, त्याचे हे उदाहरण आहे. तेव्हा आकलन अवलोकनासाठी आपण आपली दारे मोकळी ठेवायला हवी आहेत. 'वाटापळवाटा'

नाटकातील 'हेमा' अर्जुनच्या बोलण्यानं व्यथित होते आणि 'दलित म्हटलं तर शिवी ठरते आणि ब्राह्मण म्हटलं तर तो काय माझा सन्मान होतो ?' असं कळवळून म्हणते, तेव्हा तिचा आक्रोश दलित कार्यकर्ता म्हणून मला खरा वाटतही नसेल पण एक लेखक म्हणून तो आक्रोश मला खरा वाटला आहे. माझ्या काही मित्रांना हे तिचं विधान नीट कळलं नाही, असे त्यांचे म्हणणे. कारण त्यांनी मोकळपणानं आपलं जगणं समजून घेण्याआड आपल्याच पूर्वग्रहांचे घट्ट अडसर उभे केले आहेत, असं मला वाटतं.

वैयक्तिक पातळीवरचे ताणतणाव समजून घेतांना असे घडले तर फायदे नुकसान होणारही नाही, पण सामाजिक पातळीवरचे ताणतणाव समजून घेताना पूर्वग्रहांचे सर्व अडसर बाजूला ठेवणे फारच अवघड आहे असे मला चळवळीतला एक लेखक म्हणून वाटते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे नेते आणि म.गांधी हे स्वातंत्र्य चळवळीचे नेते ही अंगवळणी पडलेली आमची समजूत आहे. त्यामुळे इतिहाससिद्ध पुरावे दिले तरी आम्ही आमच्या आकलनाची फेरमांडणी करीत नाही. त्यामुळे गांधी आंबेडकर यांचा संघर्ष नाटकाचा विषय म्हणून स्वीकारणे आम्हाला अवघड जाते. या पूर्वग्रहांचे परिणाम म्हणून 'मी नथूराम बोलतो' या नाटकाला कशा मर्यादा पडल्या आणि 'गांधी आंबेडकर' ह्या प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकाने प्रेक्षकांना अस्वस्थ करण्यापर्यंत कसं आणलं याचं उत्तर मिळू शकतं.

भारताच्या संविधानाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे शिल्पकार आहेत की नाहीत या विषयीचा एक वाद अधून मधून समाजात निर्माण होतो. हा वाद निर्माण झाला की मला तीन गट दिसतात. मसूदासमितीचे अध्यक्ष या नात्याने बाबासाहेबांनी जे अपार कष्ट घेतले, म्हणून त्यांच्याविषयी आदरभावना असणारांचा एक गट आहे. तो अशावेळी अतिशय आक्रमक होतो. दुसरा गट बाबासाहेबांना या कामी किती जणांनी मदत केली हे सांगत असतो. त्याचे म्हणणे असे असते की, इ.स.१९३५ साली ब्रिटिशांनी देऊ केलेल्या घटनेत जी भर पडत गेली त्याचेच एक विस्तृत रुप म्हणजे आजची घटना. तिसरा गट शांत बसणारांचा. दुसऱ्या गटाचे म्हणणे खरेच आहे. पण उगाच बोला कशाला? त्यापेक्षा दुर्लक्ष करणे चांगले ! असे सावध वागणारांचा हा तिसरा गट. भारतीय स्वातंत्र्य चळवळ अजूनही आमच्या इतिहासाच्या अभ्यासाचा अथवा चिकित्सेचा विषय झालेली नाही असेच मी समजतो. राज्यघटना हे केवळ पुस्तक नव्हे, तर आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे ते फलित आहे. त्यामुळे बाबासाहेबांचे कर्तृत्व नाकारणे म्हणजे पर्यायाने आम्ही आमच्या स्वातंत्र्य चळवळीचा अपमान करणे होय, हे आम्ही आमच्या नव्या पिढीला केव्हा सांगणार आहोत ? म.गांधी म्हणजे राष्ट्रभक्त आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजे केवळ दलितांचे नेते ही विभागणी आणखी किती दिवस ठेवणार आहोत ? इंग्रजनिष्ठेचे

फलित म्हणून म.गांधी 'कैसर ए हिंद' या पदाने सन्मानित झाले. तरीपण ते राष्ट्रभक्त ! तर त्याच सुमारास ब्रिटिशांची राजवटच आपल्या देशातल्या रुपयाच्या अवमूल्यनाला जवाबदार कशी हे लक्षात आणून देणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना इंग्रजांचा रोष ओढवून घ्यावा लागला तरी ते केवळ दलितांचे नेते ! इंग्रजांचे निमंत्रण नाकारुन पहिल्या गोलमेज परिषदेला अनुपस्थित राहणारे पण दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजेरी लावणारे म.गांधी हे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे नेते आणि पहिल्याच गोलमेज परिषदेत इंग्रजांना for the people, of the people and by the people अशी लोकशाही स्वराज्याची मागणी करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते कसे ? "If Mr.Gandhi fails us in our efforts of secure political power to the comman man and woman in India I would not hesitate to call his act as the greatest betryal of trust and his campaign of civil disobedience as the worst expliotation of the masses for the service of classes" या विधानात डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांच्या बाजूने बोलत नाहीत तर Comman man च्या वतीने बोलत आहेत हे लक्षात घ्यायला नको का ? आणि अगदी ऐन ४२ च्या चळवळीत बाबासाहेबांवर टीका करणारे म.गांधी घटनेच्या मसुदा लेखनासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटना समितीत असावेत असा आग्रह धरतात, तो काय ते केवळ दलितांचे नेते आहेत म्हणून ? घटना समितीच्या ३८५ सभासदांपैकी सुमारे ३४५ सभासद ब्राह्मण वा उच्चवर्णीय होते, हे वास्तवही आम्ही नजरेआड करणार आहोत काय ? आणि 'मी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार नाही' असे ठणकावून सांगितल्यानंतरही त्यांना सन्मानाने मंत्रीमंडळात स्थान देणारे गांधीवादी बाबासाहेबांचा जणू दलित आहेत एवढाच विचार करीत होते, असा पूर्वग्रह आपण कधीच टाकून देणार नाही का ? आमच्या राष्ट्रवादाला समाजवादी आशयाचा पाया देणारी सुधारकांची चळवळ आणि आपल्या विषमतेची दरी कमी करीत सर्वच गटांना इंग्रजविरोधाकडे नेणारी राजकीय सत्तांतराची चळवळ या दोहोंचे एकात्मरुप म्हणजे आपली राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ आहे, हे आपण केव्हा लक्षात घेणार ? आणि 'आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा' या पवित्रा म्हणून जन्माला आलेल्या इतिहासातल्या प्रश्नाच्या भोवऱ्यातून आपण बाहेर कधी येणार ? इतिहास म्हणून या चळवळीचे स्वरुप समजून घेण्याऐवजी आपल्या वर्तमानातल्या जातीय तणावांसाठी जे घटनेचे कर्तृत्व कोणाचे ? यासारखे व्याजप्रश्न उपस्थित करतात ते केवळ बाबासाहेबांचा अपमान करीत नसतात तर ते आमच्या स्वातंत्र्य चळवळीचाच अपमान करीत असतात हे स्पष्टपणे आपण लक्षात घ्यायला हवे. अशा अवस्थेत अशा मनोवृत्तीचा निषेध करणे मला माझे कर्तव्यच

वाटते. पण त्याबरोबरच स्वातंत्र्यचळवळीकडे अत्यंत आदराने पाहून विश्लेषण करणे हे आजच्या समता न्यायाच्या चळवळीतल्या कार्यकर्त्यांना आवश्यक वाटते की नाही हाही माझा त्यांना खडा सवाल आहे. हा मुद्दा विषयांतर करुन मी सविस्तर मांडला त्याचे एक कारण आहे: आमच्या राजकीय चळवळीसंबंधी यथायोग्य मंथन झाल्याशिवाय आम्ही खऱ्या अर्थाने राजकीय नाटकाकडे वळूच शकणार नाही.

मराठीतले राजकीय नाटक एवढे थिटे का ? आज तर राजकारणाने आमच्या दैनंदिन जीवनात प्रवेश केला आहे. अजून आमची एस.टी.जिथे पोचली नाही तिथपर्यंत आमचे राजकारण पोचले आहे. अशा या राजकारणाचा लेखक कवींनी थिल्लरपणे का विचार करावा ? स्वातंत्र्यपूर्व काळातील खाडिलकर-वरेरकरांचा अपवाद सोडून दिला तर नाट्यलेखनासाठी राजकारणाचा गांभीर्याने विचार केलेला जाणवत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात तर राजकारण हा नाटककारांनी केवळ करमणुकीचा विषय करुन टाकला. हे विधान करताना मराठी प्रेक्षकांना खूप आवडलेली 'सूर्यास्त' आणि 'पुरुष' यासारखी राजकीय नाटकेदेखील मला अपवाद वाटत नाहीत. असे का घडले असावे याचे मला सुचणारे एक उत्तर मी आपल्यासमोर ठेवतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात जो अभिजन वर्ग नाट्यव्यवहारात गुंतला होता त्याच अभिजन वर्गाचे प्रतिनिधी राजकारणात नेतृत्वस्थानी होते. स्वातंत्र्य चळवळीत ध्येयवाद होताच पण या ध्येयवादाच्या तळाशी उद्याच्या सत्तांतरानंतर आपलेही काही स्थान असेल असा एक सुप्त आशावाद नव्हताच असे नाही. पण प्रौढमतदानपद्धती स्वीकारल्यामुळे या आशावादाला नख लागले. आपल्या देशातील जातीप्रेमाचे आव्हान या पद्धतीमुळे तळातून वर येईल हे स्पष्ट दिसू लागले. आणि ध्येयवादाच्या तळाशी असणारा आशावादाचा अंकुर जन्मापूर्वीच करपून गेला. आता आहे ही सत्ता अभिजनांच्या हाती टिकवून ठेवणे किंवा ज्यांच्या हाती ती जाते आहे त्यांनाच टिंगल टवाळीचा विषय करुन जनमानस बदलणे इकडे नाट्यव्यवहार वळला का ? जगण्यात विभक्तकुटुंबपद्धतीची आवड आणि मनात एकत्र कुटुंबपद्धतीचे आदर्श असा परंपरावाद हे जेव्हा मराठी माणसाचे मानस होता, त्या वेळी बाळ कोल्हटकर यांच्या नाटकांनी मराठी माणसांची छान करमणूक केली. स्वातंत्र्यानंतर राजकारणाच्या संदर्भातही अशी करमणूक करणारे नाटक जन्मास येऊ शकले असते. जगण्यात धर्म गैरसोयीचा पण मनात मात्र धर्मपरंपरेचे प्रेम या सूत्राला समोर ठेवून करमणूकप्रधान राजकीय नाटक जन्माला येऊ शकले असते. पण तिथे एक अडचण आली. स्वातंत्र्यपूर्व राजकीय चळवळीने धर्माच्या नावाखालीच शोषितांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले हे सतत सांगितल्यामुळे धर्मपरंपरेच्या अंगाने राजकारणाचे उदात्तीकरण प्रेक्षकांनी स्वीकारले नसते. म्हणून केवळ उथळ उपहासाचे राजकीय नाटकच लिहिले गेले. मी मला सुचलेले उत्तर समोर ठेवले आहे. आजच्या भ्रष्ट

राजकारणाचे आडवळणानेसुद्धा समर्थन करावे, असा त्या मागचा हेतू नाही. तर कालच्या राजकारणाने जो ध्येयवाद पेरला, शोषितांच्या हाती संविधानाचा अंकुश दिला आणि त्या राजकारणामुळे - अगदी त्याच राजकारणामुळे - आज शोषितांच्या जगात प्रकाशाचा शिरकाव झाला त्या राजकारणाचे केवळ विडंबन व्हावे हे मला अस्वस्थ करणारे वाटते.

कै.विश्राम बेडेकरांनी 'टिळक आगरकर' हे नाटक लिहिले. एक इतिहासजमा संघर्ष चित्रित करताना, त्यांना जवाबदारी पेलण्याचे कोणतेही आव्हान त्यांच्या समोर नव्हते. पण गांधी आंबेडकर यांच्यातील इतिहासातला संघर्ष आजच्या वर्तमानातही सत्ता-संघर्षाची सोय म्हणून वापरला जातो, अशा अवस्थेत त्यांच्या संघर्षावर नाटक लिहिणे फार मोठी जोखीम होती. पण ही जोखीम प्रेमानंद गज्वी ह्यांनी स्वीकारली. राष्ट्रपिता म्हणून उंची असणाऱ्या म.गांधी ह्याना कुटुंबातला पिता म्हणून खुजेपणा आणणाऱ्या काही मर्यादा होत्या. त्या गंभीरपणे आपण समजून घ्यायला हव्यात हे सूत्र घेऊन अजित दळवीनी 'गांधी विरुद्ध गांधी' हे नाटक लिहिले.

खरे तर फाळणीच्या संदर्भात मला ती भूमिका न पटणारी असली - तरी - येथील हिंदुत्ववादी मंडळीची ती एक भूमिका होती, हे मी मान्य करतो. तरी पण मन हेलावून टाकणाऱ्या फाळणीचे दु:ख आपल्या नाटकात का येत नाही ? आणि फाळणीनंतर जन्मास आलेल्या शफातखान ह्याना फाळणीचं दु:ख अतिशय गंभीरपणे नाटकाचा विषय म्हणून पेलवता का येतं ? स्वातंत्र्यानंतर गो.पु. देशपांडे यांचा एक अपवाद सोडून दिला तर राजकारणाचा विषय गंभीरपणे हाताळणारे नाटककार ब्राह्मणेतरच का असावेत ? हा एक प्रश्न मला उत्तर न सापडलेला, मला अस्वस्थ करतो.

मित्र हो, राजकीय नाटकाच्या संदर्भात मी उपस्थित केलेले प्रश्न कुणाला दुखविण्यासाठी उपस्थित केलेले नाहीत. मी माझीच समजूत तपासून घेण्यासाठी हे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे जर कुणाला दु:ख झाले असेलच तर मी क्षमाही मागू इच्छित नाही. कारण असे दु:ख व्हायलाच हवे असे माझे मत आहे. त्याशिवाय आपण बोलते होणार नाहीत आणि परस्परांशी संवाद करण्यासाठी चवताळून उठणार नाहीत. स्वातंत्र्यपूर्व काळात माणसं परस्परांशी चवताळून उठायची तरी त्यांचे संबंध बिघडत नसत. आज माणसं परस्परांशी फारच गोडी गुलाबीनं वागताना दिसतात. तरी त्यांचे संबंध मात्र संवाद हरवलेल्या गर्दीसारखे वाटतात.

गर्दीचा विषय निघाला म्हणून आणखी एका अरुचकर मुद्याकडे मी वळतो. नाट्यसंमेलनाच्या संदर्भात सिनेकलावंताच्या उपस्थितीमुळे अनावश्यक गर्दी वाढते हा मुद्दा चर्चेत आला होता. केवळ एका सिनेकलावंताच्या उपस्थितीने ही चर्चा गतवर्षी खूपच झाली. आज तर या संमेलनात सिनेकलावंतांचीही खूप गर्दी आहे.

दूरदर्शन मालिकेतील अनेक कलावंत आज इथे उपस्थित झाले आहेत.

यासंदर्भात आपण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. सिनेमा आणि नाटक ही वेगवेगळी माध्यमं असली तरी सिनेमाच्या पायाभरणीचं काम अनेक नाट्यकलावंतांनी केलं आहे. आणि त्यात मराठी नाट्यकलावंतांचा सिंहाचा वाटा होता. अनेक कलावंत हे नाटकाच्या दालनातूनच दूरदर्शनकडे सरकत आहेत. प्रत्येक माध्यमाचं एक सामर्थ्यस्थान असतं. नाटक या माध्यमाचं सामर्थ्यस्थान अभिनयाचा जिवंत प्रत्यय देणं, हे आहे. प्रत्येक माध्यमाचं बलस्थान अचूक ओळखून सर्वच माध्यमात यशस्वीपणे वाटचाल करणारा चंद्रकांत कुलकर्णी यांच्यासारखा गुणी नट मला दिसतो. अशा अवस्थेत गर्दीबद्दल खंत व्यक्त करताना कोणत्याही माध्यमातून कलावंताकडे त्याची मानहानी होईल अशा उपेक्षेने पाहू नये ही आपल्याला विनंती. हे खरं आहे की सिनेमाच्या माध्यमात पैशासाठी काही तडजोडी करणारे कलावंत असतात. पण नाट्यव्यवहारात असे घडत नाही, हे ही आपण मानता कामा नये. कै.दीनानाथ टाकळकर यांच्यासारख्या गुणी नटाला कमी पैसे मिळाले तरी चालतील पण ते मिळायला हवेत म्हणून अनेक टाकाऊ भूमिका कराव्या लागल्या आणि कितीही पैसा मिळाला तरी नाटक या माध्यमाची अनावर ओढ असणाऱ्या डॉ.लागू आणि निळू फुले यांना रंगमंचाचा मोह टाळता आला नाही. नाट्यपरिषेदेचे अध्यक्ष श्री मोहन जोशी हे सिनेमातलेही मोठे कलावंत आहेत हे आम्हास माहीत आहे. त्यामुळे त्यांना एवढा वेळ देणे कसे परवडते ? असा प्रश्न माझ्या मनात आला आणि लगेच मावळलाही. ज्याची आपणास अनावर ओढ असते त्यासाठी होईल ती परवड स्वीकारण्याची आपली तयारी असते, हाच त्याचा अर्थ.

तेव्हा आपला आक्षेप अनवधानानेही कोणत्याही माध्यमातल्या कलावंतांच्या कलागुणांची हेटाळणी करणारा नसावा. तो नाही, असेही मी गृहीत धरतो आणि खऱ्या आक्षेपाकडे वळतो.

नाट्यसंमेलनात अशा गर्दीची आवश्यकता आहे का ? दुर्दैवाने आमच्या संत महात्म्यांनासुद्धा गर्दीची किती अनावर ओढ आहे हे जर मला माझ्या वर्तमानात दिसत असेल तर आपण आपल्या राजकीय नेत्यांनी अशा गर्दीला प्रोत्साहन देऊ नये हे कसे सांगणार आहोत ? गर्दीमुळे आयोजकाचे व्यक्तिमत्व उजळून निघते. पण ह्याला कारणीभूत आहे युवा अवस्थेत आपणच घातलेला पाया. गर्दी हवी या इच्छेचा आरंभ शाळा कॉलेजपासून सुरु होतो. विद्यार्थी संसदेच्या नेत्यांना अभिनेते हवे असतात, त्यातून त्यांची आळख सिद्ध होते, असे त्यांना वाटते. जेव्हा सखोल आणि दूरगामी कृती करुन आपली ओळख निर्माण होत नसते, तेव्हा माणसे तात्पुरत्या गर्दीच्या आधारेच आपली ओळख पटवून द्यायचा प्रयत्न करतात. आणि मतदार, जर उमेदवाराने मतदारसंघासाठी काय केले याआधारे ओळखणार नसतील, तर जुजबी ओळख शिल्लक राहावी यासाठी गर्दीच्या उपायाचा नेते अवलंब करीत

असतात. गर्दी गंधहीन, रंगहीन असते. गर्दीला भावना नसतात, प्रक्षोभही नसतो. ती केवळ तात्पुरत्या काळासाठी जमा झालेली असते. त्यामुळे जशी ती जमते तशीच ती अंतर्धानही पावते. गर्दीचे रुपांतर क्रियाशील समूहात झाले तर आयोजकांची पंचाईत होत असते. आणि कोरड्या उत्साहाने गर्दी जमत असेल आणि आपल्या ओळखीचा एक शिडकावा घेऊन परत जात असेल तर आयोजक ही संधी का सोडतील ? कुंभमेळे, संत्संगाच्या जत्रा, ईद निमित्त घ्यायच्या भेटीगाठी असा व्यापक संदर्भ घेऊनच गर्दीकडे पहायला हवे. त्यात गर्दी कोणतीही असो ती आपली एक ग्राहक आहे हे नवेच भान आले आहे. त्यामुळे गर्दीला जागतिकीकरणाचेही आता पाठबळ मिळू लागले आहे. एका आठवड्यात दोन कोटी दक्षिणा मिळवणाऱ्या शिर्डीसारख्या संस्थानासहीत मग गर्दीचं महत्त्व सगळ्यांनाच पटतं.

मी मुख्य मुद्दा थोडा बाजूला ठेवला आणि गर्दीच्या मुद्याकडे वळलो. या गर्दीला टाळता येत नसेल तर आपण आपला तोल ढळू नये म्हणून नवे उपाय शोधायचे असतात. उद्‌घाटनाचा कार्यक्रम औपचारिक असेल तर नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षानेही औपचारिक स्वरुपाचे भाषण करावे. आणि परिसंवादाचे गांभीर्य रहावे तसे अध्यक्षाचे स्वतंत्र सत्रात भाषण व्हावे असे मला वाटले. हा निर्णय मग मराठी नाट्य परिषद आणि संमेलनाध्यक्ष म्हणून मी, आम्ही उभयतांनी परस्परांच्या सहमतीने घेतला. हा यावर्षी करण्यात आलेला नवा प्रयोग आहे. या प्रयोगाचे पायंड्यात रुपांतर होईल की नाही हे पुढे काळ ठरवील.

बोलता बोलता सुटून गेलेल्या आकलन अवलोकनाकडे मी पुन्हा एकदा वळतो. सामाजिक वास्तवाचं चित्रण करताना आम्ही आपल्या समाजाचं रुपही नीट न्याहळत नाही असं मला वाटतं त्यामुळं राजकीय नाटक जसं थिटं राहतं तसंच सामाजिक नाटकही एकपदरी होतं जातं, हे मला जाणवत राहतं.

आपला समाज तिपेडी वीण असलेला आहे. आमच्या समाजात व्यक्तीला उपासनेचं स्वातंत्र्य आहे. जाती कुळाचारांनी बांधून टाकलेल्या स्वतंत्र बेटासारख्या आहेत आणि तिसरा घटक - आपण ज्याची फारशी दखल घेत नाही तो रीतींचा आहे 'जात वाटली तरी रीत नाही वाटली' ही म्हण नव्या पिढीपासून फार दूर गेली आहे. हा जो रीतीचा घटक आहे तो सर्वच जातीना जोडणारा दुवा असल्यामुळे समाज संघटित ठेवण्याचं काम तो करतो. तो बराच लवचिक असतो.

आपण वारंवार हिंदू समाजाची पचनशक्ती अफाट आहे असं सांगत आलो आहोत. हा मुद्दा कधी आपण अभिमानानं मिरवतो. तर कधी परिवर्तनातील अडसर म्हणून खेदानं सांगतो. मला त्याऐवजी आपल्या समाजाच्या पचनशक्तीचं स्वरुप स्पष्ट करायचं आहे. इस्लामी आक्रमणात मूर्ती फोडली गेली तर 'देव हा दगडाच्या मूर्तीत नव्हताच, तो आमच्या मनात होता, तो तुम्ही कसा फोडणार' ? असा प्रश्न विचारुन आपण मुद्दाही टाळला आणि श्रद्धाही टिकवली. आम्ही आमच्या वर्तमानात

धर्मनिरपेक्षता पचवून सर्वधर्मसमभावाची भोंगळ कल्पना स्वीकारली. रीतीच्या बाबत तर आपला समाज लवचिक आहेच. माणसे कोणत्याही जातीचे असोत स्त्रीचे सौभाग्य अलंकार कोणते असावेत यावर एकमत. सुनेने सासूशी कसे वागावे यावर एकमत. प्रौढाने तरुणांशी कसे वागावे यावर एकमत आणि विभिन्नता आढळलीच तर रीतीबाबत लवचिक असल्यामुळं बदल करायला लगेच तयार. त्यामुळंच वाढदिवसाला औक्षण करणं आणि केक कापणं ह्यात अंतर्विरोध आहे असं आम्हाला वाटतच नाही. आणि जयभीम म्हणत तीळगूळ घेतानाही काही चूक झाली असं आपणाला वाटत नाही. इस्लामी राजवटीत आमचा देवसुद्धा फकिराच्या वेषात का भेटत होता याचा इथं उलगडा होतो. रीतीच्या बाबत इतके लवचिक असलेले आम्ही, जातीच्या मुद्यावर मात्र अतिशय अपरिवर्तनशील. तिथंही परंपरेनं अनुलोम विवाहाची परवानगी देऊन जात टिकवण्याचा इतिहास निर्माण केलेला असल्यामुळं आंतरजातीय विवाह करुनही जात टिकण्याची किमया आमच्या देशात मग घडते.

कोणत्याही नव्या सुधारणा आल्या की त्या आपल्या परंपरेशी सुसंगत करुन कशा घ्यायच्या यात आमचा तिपेडी वीण असणारा समाज यशस्वी झालेला आहे. समतेच्या अथवा न्यायाच्या लढाईत मोडून निघणे आम्हाला परंपरेने कधी शिकवलेच नाही. त्यामुळे लढाया तर उभ्या करायच्या पण बगल देण्याची व्यूहरचना आधीच मनात ठरवून. त्यामुळे सर्वच लढायात आम्ही विजयी झालो याचा आनंद आम्हाला मिळतो आणि समाजातली चिवट परंपरा शिल्लक राहिली याचेही समाधान आम्हाला मिळवता येते.

गेल्या दीडशे वर्षात जाती संपवण्याची कोणती लढाई आम्ही केली ? आम्ही जाती संपवण्याच्या नावाखाली लढाई केली ती फक्त अस्पृश्यता - निवारणाची. त्यात केवळ अस्पृश्यांचेच हितसंबंध होते असे नाही. सवर्णांचेही हितसंबंध जपले जाणार होते. त्यामुळे अस्पृश्यता सैल झाली, जात मात्र टिकून राहिली. लढाई जातीभेदाविरुद्ध केली हे सतत सांगितल्याचा आनंदही मिळाला आणि जातीची परंपरा राखली याचेही समाधान टिकवता आले. आम्ही आंतरजातीय विवाहाची चळवळ कधी केली ? काही तरुणांनी प्रेमविवाह केले. योगायोगाने त्यांच्या जाती वेगवेगळ्या होत्या. या प्रेमविवाहाला पाठबळ मिळावे म्हणून आंतरजातीय विवाहाच्या चळवळीचे लेबल आम्ही वापरले. परिणामी आंतरजातीय प्रेमविवाह सफल झाले. पण आंतरजातीय विवाहाची चळवळ मात्र जागच्या जागी तशीच राहिली.

आम्हाला एकात्म समाज निर्माण व्हावा असे वाटत होते. पण हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आम्ही कोणता कार्यक्रम आखला ? स्वातंत्र्यपूर्व काळात सर्व जाती, विभिन्न भाषिक आणि विभिन्न धर्मांचे प्रतिनिधी एकत्र यावेत हा. कशासाठी ? तर आम्ही सर्व एक आहोत या बळाचे भय दाखवून इंग्रजांनी इथून निघून जावे म्हणून. प्रातिनिधिक एकात्मता दाखवायची असेल तर प्रत्येकाला आपापला धर्म

पाळण्याची, परंपरा जपण्याची आणि भाषिक अभिमान बाळगण्याची सूट द्यावीच लागते. मग तशी सूट देण्यात आली. त्याचा परिणाम असा झाला की राष्ट्र म्हणून आम्ही संघटित झालो, पण राष्ट्र म्हणून एकात्म कधीच झालो नाहीत.

पुढे जी सूट स्वातंत्र्यपूर्व काळात दिली ती आता सत्तास्पर्धेच्या काळात फारच उपयुक्त आहे, असा नवाच साक्षात्कार आम्हाला झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात बेरजेची संघटना केली म्हणून आता बेरजेचे राजकारण करावे असे नवे वळण जन्माला आले. बेरजेचे राजकारण करायचे म्हणजे बेरजेतले आपले संख्याबळ मोठे कसे होईल, या दिशेने नवनवे उपक्रम सुरु करायचे. मग जातींचे मेळावे सुरु होतात, पण आपले ध्येय जातीविहीन समाजाचे आहे असे सांगितले जाते. कुंभमेळे-सत्संग आयोजनात सढळ हाताने मदत केली जाते आणि आपण धर्मनिरपेक्ष समाज निर्माण करणार आहोत असे सांगितले जाते. प्रांतीय भाषांचे अभिमान प्रकट करीत ग्लोबल इंग्रजीतून व्यवहार चालतो आणि देश एक करायचा तर एक राष्ट्रभाषा असायलाच हवी हेही सांगितले जाते. या सर्व द्वंद्वात माझ्यासारखा माणूस फाटून निघतो. हे सामाजिक वास्तव नाटकाचा विषय होईल एवढी अस्वस्थतता तरी का निर्माण होत नाही हा खरा माझ्या समोरचा प्रश्न आहे.

लढाईवर जाणाऱ्या सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी जुन्या काळी रणभेरी वाजवीत, पडघम आणि ढोल ताशे वाजवीत, असं सांगतात. आज काय वाजवलं जातं मला माहीत नाही. पण समाजवास्तवात पार फाटून गेलेल्या तुमच्या आमच्यासारख्यांनी मुद्याची लढाईच करु नये म्हणून व्याज प्रश्नांचे ढोल ताशे तर वाजवले जात नाहीत ? मी पद्मश्री स्वीकारतो, पण तुम्ही 'कमंडूल' 'व्यासपीठ' असले शब्द वापरु नका, त्यामुळं तुम्ही पुराणप्रिय ठराल ! मी सरस्वतीपूजक असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळाचं अध्यक्षपद स्वीकारतो, पण तुम्ही नारळ स्वीकारुन आपली अस्मिता घालवू नका ! सरस्वतीच्या पूजकांनी स्थापन केलेल्या साहित्य संस्थांच्या विश्वस्त पदाचा मी स्वीकार करतो, पण तुम्ही सरस्वतीची पूजा करु नका, त्यामुळं तुम्ही विचारभ्रष्ट व्हाल ! मी समरसता मंचावर जाऊन पुरस्कार घेईन. तुम्ही मात्र समरसता साहित्य संमेलनाचे भाषण ऐकायलाही जाऊ नका, त्यामुळे तुमची आंबेडकर निष्ठा संशयास्पद ठरेल ! मी ब्राह्मण तरुणीबरोबर आनंदानं संसार करीन कारण मी डीकास्ट झालो आहे, तुम्ही मात्र ब्राह्मणांच्या वस्तीतही राहू नका कारण त्यामुळं तुमच्यात ब्राह्मण्य मुरेल ! मी माझ्या राजकारणाची गरज म्हणून पंढरपूरची महापूजा करेल, पण तुम्ही मात्र जिज्ञासा म्हणून सुद्धा पंढरपूरच्या देवळात जाऊ नका, कारण त्यामुळं तुम्ही 'घमडे' ठराल ! अशा कितीतरी आज्ञा सोडल्या जातात तेव्हा मीच भोवंडून जातो. मी बुद्धिप्रामाण्यवादी असलो तरी ज्या खात्यात मी नोकरी करतो तिथे, भूमीपूजनाचा कार्यक्रम असेल तर मी विरोध करु शकत नाही, एस.टी.त नोकरीला असेल तर एस.टी.त लावलेल्या

'बाबाबुवा' यांच्या प्रतिमांना मी विरोध करु शकत नाही, इनकमटॅक्स वा बँकेत नोकरी करीत असेल तर तिथे असलेल्या लक्ष्मीच्या प्रतिमेला विरोध करु शकत नाही आणि मी जिथं अध्यापनाचं कार्य करतो तिथं महाद्वारातच सरस्वतीची प्रतिमा असेल तर तिलाही मी विरोध करणार नाही. मग माझा विरोध कशाला आणि कुठं असेल ? सुरक्षित राहून विरोध करता येईल अशा ठिकाणी ! आणि अशाच प्रश्नांना ! उदाहरणार्थ या देशाचा पंतप्रधान मला ओळखत नसल्यामुळे माझ्या जाहीर भाषणात त्यांच्या धोरणावर मी सडकून टीका करावी एवढं मला धाडस आहे. पण शाळेत गणपती बसवला जातो म्हणून त्याच शाळेत नोकरी करतांना मुख्याध्यापकाला मात्र विरोध करण्याचं धाडस मी करणार नाही. व्यक्तीस्वातंत्र्याच्या चळवळीतला हा असा पोकेपणा मला तीव्रतेनं जाणवत राहतो. अनेक व्याजप्रश्नांच्या रणभेरी माझ्या कानाचे पडदे फाडतात. मी कसे अवलोकन करावे समाजाचे वास्तव आणि कसे आकलनाच्या कक्षेत यावेत माझे प्रश्न ?

मित्र हो, एवढ्या गदारोळातही मला शांत राहून विचार करणे भाग आहे. कारण 'घाबरु नकोस मी तुझ्या पाठीशी नाही आहे' असं म्हणणारा कुणीच माझ्या पाठीशी नाही. आणि माझ्याच काय कुणाच्याही पाठीशी असा कुणी नसतोच ! जो असतो तो मागचे दोर संपवून टाकणारा केवळ अंधार ! आणि पुढं प्रश्नांचं अरण्य. मग कोण असतो आपला वाटाड्या ? असतो तो, आपल्या पुढं, आणि तोच आपणाला सांगत असतो 'अत्त दीप भव' तूच तुझ्या मार्गाचा प्रकाश हो.

मला कधी कधी अनेकजण नाटक वाचल्यावर, भाषण ऐकल्यावर प्रश्न विचारतात तुम्ही समतोल बोलता, तुम्हाला हे कसं जमतं ? जमतं ! कारण समतोल बोलणं हेच माझ्यावर लादलं गेलं आहे. पण ते माझं ओझं नाही. मला मानदंड वाटणाऱ्या महापुरुषानं ते माझ्यात मुरवलंय. तोल ढळेल अशी भाषा वापरुन मला टाळ्या मिळवता येतील, पण आयुष्यभर जो प्रकाश पकडण्याचा आपण ध्यास घेतला तोच हातून गळून पडेल त्याचं काय ?

भाषेचा मुद्दा निघाला म्हणून इथंच मला कर्नाटकात घडलेल्या प्रकारावर बोलण्याची इच्छा आहे.

एखाद दुसऱ्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षाचा अपवाद सोडल्यास कर्नाटक-महाराष्ट्र सीमा प्रश्नाची चर्चा अध्यक्षीय भाषणात आलेली नाही. बेळगांव नगरपालिकेच्या बरखास्तीचे प्रकरण आणि माझ्या अध्यक्षपदाची घोषणा या दोन्ही घटना एकानंतर एक घडल्यामुळे पत्रकारांनी या प्रश्नावर माझी प्रतिक्रिया विचारली. माझ्या प्रतिक्रियेतील तीव्र नाराजीचा सूर मराठी पत्रकारांना दखल घेण्याइतका महत्त्वाचा वाटला. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात मी माझी भूमिका विशद करावी अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. म्हणून या प्रश्नाच्या संदर्भात एक लेखक या नात्याने मी माझी भूमिका विशद करणे माझे कर्तव्य आहे असे मला वाटते.

माझी भूमिका विशद करण्यापूर्वी काही तपशील देणे आणि काही संदर्भांच्या नोंदी करणेही मला आवश्यक वाटते.

मित्र हो, नांदेड हा एक सीमावर्ती जिल्हा आहे. मी ज्या नांदेड नावाच्या गावात लहानाचा मोठा झालो आणि लिहिता झालो, त्या गावाचं शहरीकरण उस्मानशाही मिलमुळं सुरु झालं. आज आपण ह्या मिलला नांदेड टेक्स्टाईल या नावानं ओळखतो. या मिलमध्ये मोलमजुरी करण्याच्या निमित्ताने अनेक तेलुगू भाषक आणि कानडी भाषक लोक मजूर म्हणून इथे आले. या वर्गाची भाषा जाणणारा किरकोळ व्यापार करणारा वर्ग नांदेड गावात आला. ही नांदेडच्या शहरीकरणाची सुरुवात होती.

नांदेड येथील पवित्र गुरुद्वारामुळे नांदेड येथे पंजाबी भाषकांचीही सतत आवक जावक असते. त्यात फाळणीत होरपळलेले सिंधी बांधव इथे आले. इतकेच नाही तर हैद्राबाद मुक्तीसंग्रामात ज्यांना भीती वाटली त्या गरीब मुसलमानबंधूना या नगरीनं आधार दिला. 'पनाह' म्हणजे आधार आणि 'गजी' म्हणजे मुसलमान. त्यामुळं उर्दू भाषकांची 'पनाहगजी' वस्ती इथं निर्माण झाली. आज आम्ही या वस्तीला 'मकदूमनगर' असं नाव दिलं आहे. गुजराथी आणि मारवाडी समाज तर भारतभर विखुरलेला, व्यापार उदीम करणाराचा वर्ग आहे. त्यामुळे या माझ्या गावात गुजराथी आणि मारवाडी भाषा बोलणाराही एक फार मोठा वर्ग आहे.

या सर्व शहरीकरणाचा माझ्यावर झालेला परिणाम असा की माझे असंख्य वर्गमित्र आणि बालमित्र तेलुगू, कानडी, मारवाडी, गुजराथी आणि उर्दू भाषक आहेत. वर दिलेल्या तपशीलाइतकाच महत्त्वाचा ऐतिहासिक संदर्भही आपण लक्षात घेतला पाहिजे. ४७ वे नाट्यसंमेलन नांदेड नगरीत झाले त्यावेळी नाट्यपरिषदेचे कार्यवाह कै.राम बाबूराव शास्त्री होते. हे माझे नाट्यगुरु. काही काळ ते तेलुगू माध्यम असलेल्याआंध्रसमिती हायस्कूलचे मुख्याध्यापक होते, पण त्यांना तेलुगू कळत नव्हती. स्वातंत्र्यपूर्व काळातले या मराठवाडा विभागातले आमचे नेते ज्यांना आम्ही हैद्राबादी आंबेडकर मानत असू ते मा.बी.एस.व्यंकटराव पण त्यांनाही मराठी येत नव्हते. मराठवाड्यातले सगळेच बहुभाषक ज्यांचा आदराने नेता म्हणून उल्लेख करतात ते कै.गोविंदभाईजी गुजराथी भाषक होते. तर कानडी, मराठी आणि तेलुगू या तिन्ही भाषकांनी ज्यांना आपल्या स्वातंत्र्य संग्रामाचे नेते मानले ते ब्र.स्वामी रामानंद तीर्थ कन्नड भाषक होते. हा माझ्या घडणीतल्या इतिहासाचा ताजा संदर्भ आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

अशा परिस्थिती साऊथ सेंट्रल झोनच्या रेल्वेखात्याचा आडमुठेपणाचा अपवाद सोडून दिला तर भाषेच्या मुद्यावरुन येथील सहजीवन कधीच अस्वस्थ झाले नाही, असा माझा वर्तमान आहे. भाषेचा मुद्दा हा कधीच केवळ भाषेचा सुटा मुद्दा नसतो. निदान आम्हा मराठवाड्यातल्या मंडळीना तरी हे पक्के माहीत असते.

कारण कै.नांदापूरकरांचे मराठी भाषेच्या अस्मितेचे गीत हे हैद्राबाद मुक्तीसंग्रामातले एक स्वातंत्र्यगीतही आहे हे आम्हाला माहीत असते.

आपण आपला भाषिक भूगोल कितीही बदलला तरी आमच्या सोयरसंबंधानी अशा भौगोलिक सीमांची कधीच पर्वा केलेली नाही आणि व्यापारउदीमाच्या निमित्तानं होणारी बहुभाषकांची आवक जावक आम्ही कधीच थांबवू शकलो नाहीत. तीर्थाटन करतानाही राजकीय सीमा आम्ही पुसून टाकल्या. काळ कोणताही असो 'शांततामय सहजीवन' हीच आपली मानसिकता राहिली, असा आपला इतिहास आहे. त्यामुळं भाषावार प्रांतरचना मान्य करुनही एकात्म समाज निर्माण करण्यासाठी आज आम्ही घटनेनेच जर बांधील असू तर भाषेचे निमित्त पुढे करुन कुणी दहशत निर्माण करीत असेल तर लेखक वाचक म्हणून आपणाला गप्प कसे राहता येईल. खरे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा भाषावार प्रांतरचनेलाच तत्वत: विरोध होता. प्रौढ मतदान पद्धतीमुळे प्रदेशविशिष्ट असलेल्या एकेका भाषकांचे बहुसंख्यांकाचे गट आपले प्रतिनिधी निवडून आणतील, आणि लोकशाहीच्या नावाखाली ती एकेका भाषिक गटाची हुकूमशाही असेल, असा इशारा त्यांनी दिला होता. पण असे असले तरी त्यांनी लोकमताचा आदर राखला. आणि सीमावर्ती भागातील कोणत्याही अल्पसंख्य भाषकांवर अन्याय होऊ नये म्हणून घटनात्मक तरतूदी केल्या. याच तरतूदीचा आधार घेत गेली पन्नास वर्ष बेळगावचे मराठी भाषक महाराष्ट्रात येण्याची मागणी करीतआहेत. ही त्यांची मागणी म्हणजे स्वतंत्र पाकिस्तानची मागणी नव्हे की वेगळ्या बोडोस्तानचीही मागणी नव्हे, हे आपण लक्षात घ्यायलाच हवे.

बेळगाव पालिकेने यापूर्वीही असे ठराव केले. पण पालिका बरखास्त करण्यात आली नाही. यावेळी मात्र पालिका बरखास्त झाली. हे कायदेशीर आहे की नाही हे न्यायव्यवस्था ठरवेल. सीमाप्रश्नदेखील न्यायालयात प्रलंबित आहे. त्याचाही योग्य तो निर्णय आज ना उद्या लागेल. त्यामुळे माझ्या भूमिकेचा संबंध न्याय, कायदा आणि राजकारण या पलीकडे असणाऱ्या नैतिकतेशी आहे. एका महापौराच्या संदर्भात भाषेच्या मुद्यावरुन जे आक्रमक वर्तन घडले, त्याचा सीमावर्ती मराठी भाषकांच्या मनावर काय परिणाम झाला असेल ? त्यांच्या मनात दहशत निर्माण झाली नसेल ? अशा वेळी मा.मुख्यमंत्री विलासराव देशमुख ह्यांनी वेळीच दखल घेऊन योग्य त्या हालचाली केल्या, ही गोष्ट अभिनंदनीयच आहे. नाट्यपरिषदेच्या अध्यक्षानी मा.मोहन जोशी - ह्यांनी नाटकाचे दौरे पूर्वीप्रमाणेच काढले जातील असा निर्णय घेऊन जो दिलासा दिला त्याचेही आपण स्वागतच करायला हवे. न्या.नरेंद्र चपळगावकर ह्यांनी या प्रश्नावर उपाय म्हणून सूचना केली तिचाही गंभीरपणे विचार व्हायला हवा. माझ्या भूमिकेचा कुणी विपर्यास करु नये असे वक्तव्य व्हावे ही जी सूचना आदरणीय पन्नालालजी सुराणा ह्यांनी केली तीही मी मान्य करतो.

पण या प्रश्नावर लेखक म्हणून मीही काही देणे लागतो असेच मला वाटते.

सामाजिक एकात्मता निर्माण होण्याआड येणाऱ्या कोणत्याही बाबीला विरोध करणे ही लेखक म्हणून आपल्या घटनेनेच आपल्यावर टाकलेली जवाबदारी आहे, असे मी मानतो. म्हणून या प्रश्नाच्या संदर्भात माझी भूमिका नैतिक स्वरुपाची आहे. ती राजकीय नाही किंवा कायद्याची नाही, हे मी अधोरेखित करतो. मराठी लेखकांनी आणि वाचकांनी आदरणीय गिरीश कर्नाड आणि सन्माननीय ज्येष्ठ कादंबरीकार भैरप्पा यांच्यावर मनापासून प्रेम केले आहे 'भय इथले संपत नाही' हे अतिशय कटु वास्तव असले तरी समाज भयमुक्त व्हावा यासाठीच श्रेष्ठ लेखक कवींची लेखणी झिजत आली आहे. सर्वश्री गिरीश कर्नाड अथवा भैरप्पा याच कोटीतले लेखक आहेत. मग त्यांची ह्या प्रश्नी काही प्रतिक्रिया आमच्यापर्यंत पोचली नाही ? बंगळूरमध्ये मराठी माणसावर स्त्रिया आणि बालकांवर लाठीमार करणाऱ्या पोलिसांची बातमी त्यांच्यापर्यंत पोचली नाही ? स्वत: कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि कन्नड भाषिक लेखक मौन पाळतात हे खटकल्यावाचून राहत नाही.

मला स्वत:ला वाटते, उभय भाषिक लेखकांची एक लहानशी का होईना पण समिती निर्माण करावी. या कामी आमच्या साहित्य महामंडळानं अथवा नाट्यपरिषदेनं पुढाकार घ्यावा आणि ज्येष्ठ कन्नड साहित्यकांनी अथवा रंगकर्मींनी यासाठी वेळ द्यावा. सीमा भागातील मराठी माणसांच्या मनातील अन्यायाची जाणीव दूर होईल, भीतीचे वातावरण कमी होईल यासाठी लेखकानी समजून देण्याघेण्याच्या पातळीवर काही पाठबळ पुरवावे. मुंबईसारख्या बहुभाषक गावात आणि बहुभाषक लेखकांचे वास्तव्य असणाऱ्या गावात अशी एखादी समिती क्रियाशील करणं अवघड आहे, असं मला वाटत नाही. बहुभाषक मराठी माणसांच्या वस्त्यांत मराठी माध्यमांमधून शिक्षण घेणं ज्यांना आवश्यक वाटतं त्यांची व्यवस्था कर्नाटक शासनाने करायला हवी, असं मला वाटतं. आमची मातृभाषा नसणाऱ्या अथवा देशभाषा नसणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आम्ही सर्वत्र चालवतो, मग मराठी शाळेच्या मागणीला विरोध का असावा ? पैशाच्या जोरावर इंग्रजीतून शिक्षण घेण्याइतकी येथील माणसे सक्षम नसतील अथवा असतील, चरितार्थाची सोय म्हणून त्यांना स्थलांतर करणे परवडणारे नसेल किंवा कदाचित असेलही पण बहुसंख्य असणाऱ्या प्रदेशात मराठी माध्यमातून शिक्षणाचा जो घटनादत्त अधिकार त्यांना आहे त्यापासून त्यांना वंचित कसे ठेवता येईल ? आणि तीही त्यांची मागणी असेल तर ? तेव्हा मी ज्या प्रवाहातला रंगकर्मी आहे ती रंगभूमी सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारी असल्यामुळे या प्रश्नावर तीव्र नाराजी प्रकट करणं आणि माझी भूमिका विशद करणं मी माझं कर्तव्यच मानतो.

मला अनेक पत्रकारांनी, रंगकर्मींनी आणि नाटक व रंगभूमीची आवड

असणाऱ्या नागरिकांनी असा प्रश्न विचारला की संमेलनाध्यक्ष या नात्यानं माझ्या वर्षभरातल्या योजना कोणत्या ? मी कोणते प्रकल्प राबवू इच्छितो ? खरे तर हा प्रश्न आतापर्यंत प्रत्येकच संमेलनाध्यक्षाला विचारण्यात आला आहे, असं माझं निरीक्षण आहे. अनेक संमेलनाध्यक्षांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अशा काही उपक्रमांची नोंदही करुन ठेवली आहे. गेल्या ८५ अध्यक्षांपैकी अनेकांची भाषणं मी मिळवून वाचली. या संमेलनाध्यक्षांपैकी काही संमेलनाध्यक्ष यांचा रंगभूमीविषयीचा कळवळा, रंगभूमीविषयीचं त्यांचं चिंतन इतकं सखोल आणि मार्मिक आहे की, मी त्यांच्या पासंगालाही पुरत नाही. काहींनी अनेक चांगल्या योजना सुचवल्या आहेत. पण त्या फलद्रूप झालेल्या नाहीत. कै.पु.ल.देशपांडे यांच्यापासून तो आमचे मित्र 'वऱ्हाड' कार लक्ष्मण देशपांडे यांच्यापर्यंत अनेक संमेलनाध्यक्षांनी रंगभूमीच्या संदर्भात कायकाय करता येणं शक्य आहे याची नोंद केली आहे. मी वाचलेल्या भाषणांपैकी नटवर्य नानासाहेब फाटक, प्रा.भालबा केळकर, मा.श्री.प्रभाकर पणशीकर, कै.पु.ल.देशपांडे, श्री आत्माराम भेंडे, प्रा.लक्ष्मण देशपांडे यांच्या भाषणात अनेक उपक्रमांची वाच्यता करण्यात आली आहे. यापैकी अनेक संमेलनाध्यक्षांची निरीक्षणेही ऐतिहासिक स्वरुपाची आहेत. अशा काही नोंदीची मी उदाहरणे देतो. आजच्या नाट्यपरिषदेच्या नामकरणात 'अखिल भारतीय' असा विस्तार करण्यात बेळगाव येथील आयोजकांचा खूप मोठा वाटा होता. नाटकातील सुवर्णयुग चालू होते त्या काळात बॅ.जयकर ह्यांनी मराठी नाटकातील अतिरंजीत करमणुकीबद्दल आपली नापसंती व्यक्त केली. १९२० नंतर विद्वानांचा संबंध तुटला अशी खंत संमेलनाध्यक्ष करु लागले. 'शहरातले नाटक आणि लोकनाट्य एकत्र झाल्याशिवाय कसं राहणार' असं भाकित पु.ल.देशपांडे ह्यांनी केलं, तेव्हा त्यांच्या डोळ्यासमोर शाहीर अमरशेख आणि शाहीर साबळे नक्कीच असणार. महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी न्यायमंदिरं आहेत तशी रंगमंदिरं झाली पाहिजेत ही अपेक्षा कै.पु.ल.देशपांडे ह्यांनी नांदेडच्या अध्यक्षपदावरुनच बोलून दाखवली. पंचवीस वर्षापूर्वी प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीत दुरावा निर्माण होणं सुरु झालं, तो पाहून 'व्यावसायिक रंगभूमीची प्रयोगशाळा म्हणजे प्रायोगिक रंगभूमी. पण दोघेही एकमेकांकडे संशयाने पहातात,' अशी खंत आत्माराम भेंडे यांनी व्यक्त केली. शाळांमधून नाट्यशास्त्र विषय अभ्यासक्रमात असावा हा उपक्रम अनेक अध्यक्षांनी वेळोवेळी सुचवला आहे. नाट्यलेखनाच्या कार्यशाळा, अभिनयाची प्रशिक्षण शिबिरे, बॅकस्टेज आर्टिस्ट आणि वृद्ध कलावंतांना अर्थसहाय्य, अशा अनेक उपक्रमांचा उहापोह यापूर्वीच अनेक संमेलनाध्यक्षांनी केला आहे. कै.कन्नमवार मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांच्या उपस्थितीत पाच लक्ष मुलांच्या साक्षीने ललित कलापीठाचं आश्वासन देण्यात आलं होतं. त्याचं काय झालं ? असा सवालही संमेलनाध्यक्षांनी विचारला आहे. तेव्हा एवढे सगळे उपक्रम या आधीच सांगून झाले आहेत. ते राबवण्यासाठी, या उपक्रमांचा

पाठपुरावा करण्यासाठी आपल्याजवळ कितीसे मनुष्यबळ आहे ? किती कोष आहे ? तेव्हा मी कोणतेही नवे उपक्रम सुचवावेत एवढा व्यापक विचार करणारा संमेलनाध्यक्ष नाही. पण या सर्व संमेलनाध्यक्षांची जास्तीत जास्त भाषणे उपलब्ध झाली तर 'निवडक अध्यक्षीय भाषणांचा' संग्रह संपादित करु शकेल. या कामी नाट्यपरिषदेनं प्रकाशनाची जवाबदारी स्वीकारावी अशी विनंती मी करेन. नाट्यवाङ्मयाच्या इतिहास लेखनाची ही साधन-सामुग्री ठरु शकेल. तसेच हे संपादन वेगवेगळ्या योजना ज्या पूर्वाध्यक्षांनी सुचवल्या आहेत त्याचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरु शकेल, असे मला वाटते.

या शिवाय गेल्या दोन महिन्यात मी जिथे जिथे गेलो, रंगकर्मींशी चर्चा केली त्यातून त्यांच्या अडचणी समजल्या त्या दूर करण्यासाठी आपणाला काही करता येणं शक्य आहे का, याची मी नोंद करु इच्छितो. महाराष्ट्र शासन नाटक आणि रंगभूमी या दोघांच्या विकासासाठी विशेष लक्ष पुरवणारं शासन आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा.कै.यशवंतराव चव्हाण यांनी साहित्य संस्कृती आणि रंगभूमी या संदर्भात दूरदृष्टी ठेवून सुरु केलेले उपक्रम आजपर्यंत अबाधित चालू आहेत. या उपक्रमात नवी भर पडली आहे. त्यामुळं महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमशीलतेबद्दल मी तमाम रंगकर्मींच्या वतीने आभारच मानतो. आणि असं असलं तरी थोडेसे असमाधान व्यक्त करुन शासनाने या कामी लक्ष पुरवावे अशी विनंती करतो.

गेल्या अनेक वर्षापासून चालू असणाऱ्या नाट्यस्पर्धामधील मरगळ झटकण्याचे काम महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक खात्याने सुरु केले आहेच. त्यात त्यानी अधिक लक्ष घालून स्पर्धेत सहभागी होणाऱ्या नाट्यसंघांचा नाट्य निर्मितीचा खर्च आणि त्यांना मिळणारे अनुदान ह्यातील विसंवाद दूर व्हावा असे प्रयत्न करावेत, अशी मी विनंती करतो. स्पर्धेतील कलावंतांना मिळणारा दैनंदिन भत्ता अवघा २५ रुपये आहे तर नाट्यनिर्मितीपोटी संघाला केवळ १००० रुपयांचे अनुदान मिळते. प्रयोगाच्या दिवशी होणारी तिकिट विक्री एवढी अत्यल्प की त्यापोटी होणाऱ्या उत्पन्नातून ५० टक्के नाट्यसंघाला मिळावेत असे म्हटले असले तरी प्रत्यक्षात मात्र नगण्य रक्कम स्पर्धक संघाला मिळते या सर्वच खर्चाचा पुनर्विचार व्हायला हवा. सतत पाच किंवा अधिक वर्ष स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संस्थांना विशेष अनुदान द्यावे म्हणजे अशा संस्थांना दर्जा राखण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

नाटक ही शिकवण्याची कला नव्हे असे मानले जात असे त्याकाळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नाट्यशास्त्र विभाग सुरु केला. आदरणीय श्री कमलाकर सोनटक्के आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या विभागाला विकसित केले. आज या विद्यापीठातील काही महाविद्यालयानीही नाट्यशास्त्र विभाग सुरु केलेले आहेत. ज्यांना ही दूरदृष्टी होती, त्यांनी हे विभाग आधी सुरु केले

त्यामुळे आज या विभागांना महाराष्ट्र शासनाचे अनुदानही मिळते. पण मुंबई पुणे विद्यापीठाने ह्या बाबतीत थोडा उशीर केला. पण गेल्या काही वर्षातले या विद्यापीठांचे कार्य मात्र नजरेत भरण्याजोगे आहे. सुदैवाने दोन्ही ठिकाणी अनुक्रमे श्री वामन केंद्रे आणि डॉ.सतीश आळेकर यांचे नेतृत्व लाभले आहे. पण एवढ्या महत्त्वाच्या विद्यापीठातले हे दोन्ही विभाग मात्र विना अनुदानीत तत्वावर चालतात हे ऐकून कुणालाही आश्चर्य वाटेल. प्रयोगजीवी कलांचे अध्यापन विनाअनुदानीत पद्धतीने चालवणे हे किती कष्टाचे आहे हे आपण जाणतो. कदाचित विनाअनुदानीत तत्त्वांवर नाट्यशास्त्र विभाग चालणारी ही विद्यापीठे जगातही अपवाद स्वरुप असू शकतील. किमानपक्षी या दोन्ही विभागांसाठी एखादे पॅकेज देता येईल कार्याचा सांस्कृतिक खात्याने अवश्य विचार करावा असे मला वाटते.

बॅकस्टेज आर्टिस्ट हा तर नाट्यव्यवहारातला जणू गावकुसाबाहेरचाच नागरिक असावा अशा त्याच्या कथा आहेत. वृद्ध कलावंताच्या संदर्भातल्या आर्थिक मदतीच्या योजना अतिशय दिरंगाईच्या पद्धतीने हाताळल्या जातात. कादंबरीच्या क्षेत्रात युग गाजवणाऱ्या साहित्य संमेलनाच्या एका माजी अध्यक्षाने संबंधाच्या जोरावर या योजनेचा लाभ घेतला होता, हे मला माहीत आहे. तेव्हा या संदर्भात असे काही घडू नये म्हणून अर्थसहाय्य दिल्या जाणाऱ्या प्रकरणांचे आणि प्रलंबित प्रकरणांचेही स्वतंत्रपणे अवलोकन होईल अशी व्यवस्था केली जावी, असे सुचवावेसे वाटते.

नाट्य स्पर्धांचे गेल्या कित्येक वर्षात बहुधा मूल्यांकन केले गेले नसावे. नाट्यस्पर्धांनी एकेकाळी व्यावसायिक रंगभूमीच्या अभिवृद्धीला फार मोठा हातभार लावला. पण आज असे घडते आहे असे ठामपणे म्हणता येते का ? येत्या काही वर्षात राज्य नाट्यस्पर्धेच्या सुवर्णमहोत्सवाची सुरुवात होणार आहे. त्यामुळे या स्पर्धेचा आढावा घेता येईल अशी एखादी ज्येष्ठ रंगकर्मींची समिती निर्माण करावी. या समितीत स्पर्धेकडून व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल करणारे रंगकर्मी, समीक्षक, आस्वादक आणि हौशी संस्थांचे प्रतिनिधी असावेत असे मला वाटते. या समितीने स्पर्धेच्या प्रेक्षकांच्याही प्रतिक्रिया लक्षात घ्याव्यात. एकूणच राज्य नाट्यस्पर्धेला नवी चालना मिळेल असे पाऊल महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य खात्याने उचलावे अशी मी विनंती करतो.

स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्ष उलटली तरी काही बाबतीत आपले मानस बदलत नाही. बँका, विद्युत मंडळे, परिवहन खाते, विद्यापीठाचे युवक महोत्सव अशा कितीतरी ठिकाणी वेगळ्या नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जातात. अशा वेळी मोठ्या शहरातून एखाद्या मान्यवर दिग्दर्शकाला अल्पसा मोबदला देऊन दिग्दर्शनासाठी बोलावले जाते. त्या ऐवजी या सर्वच खात्यात क्रीडा शिक्षकांचे पद असते तसे सांस्कृतिक उपक्रम राबवण्यासाठी एखादे पद का असू नये ? क्रिकेटमध्ये जाणाऱ्या

खेळाडूसाठी विशेष तरतुदी, मग आपला अतिरिक्त वेळ नाटकांसाठी देणाऱ्या कर्मचाऱ्यास मात्र अनेक वेळेला सेवेतले कायदेशीर अडथळे, असा भेदभाव का असावा ? आज एकही कार्यालय असे नसेल की जिथे वर्षातून एखाद दुसरा सांस्कृतिक उपक्रम घेतला जात नाही. अशा वेळी अप्रशिक्षीत कर्मचाऱ्यांची किती धावपळ होते हे माझ्या प्रमाणेच अनेकांनी अनुभवले असेल. शाळेत क्रीडा शिक्षक असतो. जिल्हा परिषदेच्या पातळीवर तर क्रीडा अधिकारी असतो. मग बालपणीच नाट्य-संगीताचे संस्कार रुजवावेत यासाठी एखादा कला शिक्षक का नको ? खरे तर चित्रकलेप्रमाणेच शालेय पातळीवरही नाट्यशास्त्र हा ऐच्छिक विषय असावा. हा विषय मुलांवर मुळीच बोजा निर्माण करणार नाही. उलट कुठलाही शीण न घेता मुले आनंदाने हा विषय शिकतील याची सर्वानाच खात्री आहे.

मा.अशोकरावजी चव्हाण यांच्या उपस्थितीत साई एकांकिका स्पर्धेच्या वेळी मिनी थिएटरच्या आवश्यकतेबद्दल मागे एकदा मी बोललो होतो. इ.स. १९९३ साली स्वयंवर या नाटकाच्या सादरीकरणाला १५० वर्ष पूर्ण झाली. या निमित्ताने ठिकठिकाणी महाराष्ट्रातील रंगकर्मी नाट्य चळवळीच्या विकासाच्या संदर्भात बोलत होते. त्यापैकी मीही एक होतो. महात्मा फुले यांनी 'तृतीय रत्न' हे पहिले आधुनिक नाटक लिहिले. या घटनेला आता या वर्षी १५० वर्ष पूर्ण होत आहेत. नाट्यसंकुले आणि वातानुकूलीत नाट्यगृहे ही मोठ्या शहरांची भूषणे आहेत. पण लहान लहान नाट्यमंदिरे ही नाट्य चळवळीला पोषक ठरतील अशीही ठिकाणे आहेत. शंभर ते दोनशे खुर्च्या अथवा बैठी आसन - व्यवस्था असणारे ओपन थिएटरही प्रत्येक छोट्या मोठ्या गावातली एक गरज आहे. चार स्पॉट्स बसतील असे बॅटन, एखाद दोन डिमर, चारपाच स्पॉट्स, छत असणारा ओटा आणि त्यामागे रंगभूषेचे दालन आणि कायम ध्वनीवर्धक असेल अशी व्यवस्था एवढेसुद्धा मिनी थिएटरसाठी पुरते. आजच्या कुठल्याही गावात मिनी थिएटरला पुरेल एवढी मोकळी जागा जवळपास प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे असते. या मोकळ्या जागा मंदिरे बांधण्यासाठी नसतात. प्रत्येकाच्या घरात देवघर आणि प्रत्येकाच्या गावात परंपरेने चालत आलेले एक देऊळ असेल तर ह्या जागा देवळाला देण्याऐवजी ग्रंथालयं, नाट्यमंदिर, सभागृह यासाठीच वापरल्या जाव्यात. हे सरकारनं नाही आपण ठरवायचं. जर मराठी माणूस म्हणून आपलं नाटकावर प्रेम असेल तर असा मोकळ्या जागेचा भूखंड आपण द्यावा. ज्या संस्था हे भूखंड द्यायला तयार आहेत, तिथे ओटा आणि बांधकामासाठी शासनानं किमान पैसा द्यावा आणि साधन सामुग्रीसाठी नाट्यपरिषदेनं निम्मा खर्च व स्थानिक हौशी मंडळीनी निम्मा खर्च वाटून घ्यावा. या स्वरुपाचे मिनी थिएटर सर्वच गावातून सारखे असेल, यासाठी याचे डिझाइनही समान असावे. खरे तर स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्मा स्मारके बांधताना हाही विचार केला गेला असता तर लहान गावातील मिनी थिएटरची गरज सहज भागली असती. गाव तिथे ग्रंथालय

ही मराठी वाचकांची मागणी आहे. सुव्यवस्थित ग्रंथालय चालवले तर इमारत बांधकामासाठी निधी दिला जातो तिथेही या मिनी थिएटरची निर्मिती करता येऊ शकेल. नाट्यसंकुले अथवा वातानुकूलीत संकुले ही सर्वसामान्य नाट्यसंस्थांना न परवडणारी असतात. तिथे व्यावसायिक नाटकांचे प्रयोग होतील. पण कमीत कमी साधन सामुग्रीसह मोजक्या प्रेक्षकांसमोर ज्यांना सादरीकरण करावयाचे आहे त्यांना मिनी थिएटर्सच परवडू शकतील. अशी केन्द्रे सतत काही प्रयोग करीत राहिली तरच लहान सहान गावातसुद्धा प्रेक्षकांचे पुंजके निर्माण होतील.

नाटकाचे दर महाग आहेत याविषयीची तक्रार प्रेक्षक सतत करीत असतात. जगातल्या कोणत्याही नाट्यगृहांचे दर कमी नाहीत. त्याला मराठी नाटक तरी अपवाद कसे असू शकेल ? नाटक जर मराठी माणसाचे 'वेड' असेल तर या वेडासाठी अन्य छंदापेक्षा थोडे अधिक पैसे मोजावेत हे आपण गृहितच धरले पाहिजे. खरे तर गेल्या पंचवीस वर्षात जेवढ्या मोठ्या प्रमाणात मध्यमवर्ग निर्माण झाला तेवढ्या मोठ्या प्रमाणात नाटकाचा प्रेक्षक मात्र वाढला नाही. नाटक ही केवळ करमणूक आहे, असे गृहीत धरले की करमणुकीच्या अन्य उपक्रमांच्या दराशी नाटकाची तुलना होणारच. पण नाटक मनाला सुसंस्कृत करणारा एक उपक्रम आहे, हे मानले तर आपण नाटकाच्या तिकिट दराची फारशी तक्रार करणार नाहीत. एकेका आठवड्यात तीन तीन कोटी रुपये दक्षिणेतून एखाद्या देवालयास मिळत असतील, तर आपण अग्रक्रम कशाला देतो याचा विचार करायला हवा. प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी नाटक हा पाचवा वेद आहे असं म्हणायचं आणि व्यवहार मात्र ती केवळ करमणूक आहे असा ठेवायचा, अशी कशी आपली परंपरा आहे ? 'वेद' हा शब्द ज्या संस्कृतीत प्रतिष्ठा मिळवण्यासाठी अत्यंत आवश्यक वाटत होता कदाचित अशा काळात भरतमुनींनी स्वत:च नाटकाला पाचवा वेद म्हटलं असावं. आजही 'यज्ञ' करायचा म्हटलं तर निधी कमी पडत नाही. देऊळ बांधायचे अथवा देवळाचा जीर्णोद्धार करायचा म्हटलं तर फार मोठ्या आर्थिक अडचणींना तोंड द्यावं लागत नाही. शिक्षणासाठी शाळा आणि सुसंस्कृत होण्यासाठी नाटक, याचा मराठी माणसाच्या जीवनात शेवटचा क्रम असतो.म्हणूनच परंपरेतही नाटकवाल्यांचा दर्जा बेतास बातच असतो. आज या संमेलनात सिनेक्षेत्रातली बरीच मंडळी उपस्थित आहे. त्यांनी जर मनावर घेतले तर आपल्या प्रिय व्यक्तींच्या स्मरणार्थसुद्धा असे मिनी थिएटर उभे करणे त्यांना अवघड नाही. किंबहुना प्रचंड आर्थिक उलाढाल असणाऱ्या चित्रपट व्यवसायाचा पाया नाटकवाल्या मंडळीनीच घातला आहे. मुंबईचे 'पृथ्वी' थिएटर म्हणजे कर्तबगार कपूर मंडळींनी नाट्यवेड्या वडिलांचे पांग फेडणे होय. हा कित्ता मिनी थिएटरच्या संदर्भात आणखी काही चित्रपट कलावंतांनी अवश्य गिरवावा अशी मी त्यांना विनंती करतो. मा.अशोकरावजी हे स्वत:नाटकाच्या उपक्रमात रस घेणारे मंत्री आहेत. त्यांनी नांदेड शहरात जी साई एकांकिका स्पर्धा चालवली होती तिचे स्मरण निदान

आम्ही मराठवाड्यातल्या सर्वच कलावंतांना आहे. शिवाय त्यांचा सिनेउद्योगातही खूप मोठा मित्र परिवार आहे. शिवाय महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्यखातेही त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांनी मनावर घेतले आणि अ.भा.मराठी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष श्री.मोहन जोशी यांनी क्रियाशील सहकार्य केले तर अनेक गावात गरजेप्रमाणे हौशी मंडळींसाठी मिनी थिएटर्स निर्माण होऊ शकतील. व्यावसायिक नाटक आणि हौशी मंडळींचं नाटक यातला एक फरक मी नोंदवू इच्छितो. खरे तर सगळ्यांनाच तो माहीत आहे. मी नवे काही सांगतो असे नाही. नाट्यप्रयोगाच्या सादरीकरणाची गरज म्हणून ज्या ज्या गोष्टी आवश्यक असतात तिथे दर्जेदार व्यावसायिक संघ शक्यतो कोणत्याच तडजोडी करीत नाहीत. प्रयोग सुविहित व्हावा, सफाईदार व्हावा, सादरीकरणाच्या अंगाने तो परिपूर्ण व्हावा याबाबत जी जागरुकता व्यावसायिक निर्माते दिग्दर्शक दाखवतात, तुलनेने हौशी संघ मात्र या बाबत अनेक वेळेला दुर्लक्ष करतात, वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करतात. अर्थात काही हौशी संघ याला अपवाद आहेत. पण वेळ मारुन न नेता सादरीकरणाच्या अंगाने प्रयोग परिपूर्ण होईल याची काळजी मराठवाड्यातील नाट्यसंघांनी घेतली तर मराठवाड्यात हौशी रंगभूमी उभी राहू शकेल अशी आज स्थिती आहे. औरंगाबाद येथे एकनाथ रंगमंदिर आहे. काही महिन्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचं अत्यंत अद्ययावत असं नाट्यशास्त्र विभागाचं नाट्यगृह सुरु होण्याची शक्यता आहे. बीड येथे नगर परिषदेनं सुरु केलेलं वातानुकूलीत नाट्यगृहाचं बांधकाम पूर्ण होण्याच्या अवस्थेत आहे. अगदी अल्प काळात लातूर येथील नाट्यगृह पूर्ण होत असून नांदेडचे कै.शंकरराव चव्हाण वातानुकूलीत नाट्यगृह आता नुकतेच सुरु झाले आहे. या प्रत्येक ठिकाणातील अंतर १०० ते २०० किलोमीटरपेक्षा कमी आहे. त्यामुळं एखाद्या नाट्यसंघाला व्यावसायिक पद्धतीने दौरा काढणे सोपे जाणार आहे. मुंबई, पुणे येथील नाट्य कलावंतांना सलग ४-५ दिवस मोकळे मिळतील अशी शक्यता कमी आहे. अशा अवस्थेत मराठवाड्यात धाडसानं कुणीतरी व्यावसायिक नाटकाच्या उपक्रमाला सुरुवात करावी असा हा अनुकूल काळ आहे. मराठवाड्यात सांस्कृतिक मागासलेपण नाही, हे सांगण्यासाठी आज पुणे आणि मुंबई येथे मराठवाड्यातील किती कलावंत आपले कर्तृत्व दाखवीत आहेत याची यादी देण्यात येते. मराठवाड्यातील सांस्कृतिक पुढारलेपणाचा हा जणू पुरावा आहे असे गृहित धरण्यात येते. मला स्वत:ला मात्र हे मान्य नाही. याचा अर्थ एवढाच की, वातावरण मिळाले तर नैपुण्य दाखवू शकतील असे अनेक कलावंत इथे आहेत. पण आपल्या सुप्त सामर्थ्याच्या विकासासाठी त्यांना पुणे आणि मुंबईपर्यंत जावे लागते हे आपल्या मराठवाड्यातील सांस्कृतिक मागासलेपणच होय. ज्या दिवशी सुप्त सामर्थ्य असणाऱ्या असंख्य कलावंतांना त्यांच्यातील सुप्त गुणांच्या विकासासाठी पुरेसे पाठबळ मराठवाड्यातील रसिक देऊ करतील तो दिवस मराठवाड्यातील सांस्कृतिक प्रगतीचा

पहिला दिवस असेल. जालना जिल्ह्यातील ताजे उदाहरण म्हणजे ग्रामीण भागातील कलावंतांनी सादर केलेल्या 'आकडा' या नाटकाचे आहे. वर्तमानातला ज्वलंत प्रश्न आणि अंगावर ॲसिड ओतले जाईल अशी भाषा-पण केवळ या दोहोच्या सामर्थ्यावर त्यांनी मुंबईच्या प्रेक्षकाला खिळवून सोडले. आज त्यांचा आपल्या या संमेलनात प्रयोग होणार आहे. पण मुंबईला जाण्यापूर्वी या कलावंतांनी मराठवाड्यात या एकांकिकेचा प्रयोग केलाच नसेल असं नाही. 'थांबा रामराज्य येतंय' या प्रयोगाचा पीटर ब्रूकने गौरव केला. मराठी भाषा न कळताही आणि दिल्लीच्या प्रेक्षकांनी या प्रयोगाला भरपूर प्रसिद्धी दिली. त्याआधी 'थांबा रामराज्य येतंय' या नाटकाचा इथं प्रयोग झालाच नव्हता असं नाही. मी अशी आणखी काही उदाहरणे देऊ शकतो. हे ही खरेच आहे की, सातत्याच्या बाबत मराठवाड्यातले नाट्यसंघ हिरमुसले झाले आणि कच न खाता लक्ष्मण देशपांडे ह्यांनी आपले वऱ्हाड थेट लंडनपर्यंत पोचवून आणले. तेव्हा मराठवाड्यातील नाट्यसंघांनी व्यावसायिकतेकडे वळावे असा हा अनुकूल काळ आहे असं मला वाटतं.

मित्र हो, हे वर्ष नांदेड येथील गानतपस्वी कै.अण्णासाहेब गुंजकर ह्यांचे जन्म शताब्दी वर्ष आहे. नांदेड येथे झालेल्या ४७ व्या नाट्यसंमेलनात कै.अण्णासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली 'सं.शारदा' या नाटकाचा एक देखणा प्रयोग झाला होता. या प्रयोगानंतर दुसऱ्यादिवशी संमेलनाध्यक्ष पु.ल.देशपांडे ह्यांनी या प्रयोगातील गायक कलावंताना जी जाहीर शाबासकी दिली ती मला अजूनही स्मरते. पुढे अण्णासाहेबांच्या नंतरही नांदेडकर कलावंतांनी संगीत नाटक सादर करण्याचा प्रयत्न बंद पडू दिला नाही. 'सं. शारदा' नंतर सुमारे साडेतीन दशकांनी नांदेडच्या नाट्य कलावंतांनी 'सं.कट्यार काळजात घुसली' या नाटकाचा प्रयोग केला. यातील अनेक कलावंत अण्णासाहेबांच्यानंतर त्यांच्या शिष्यवर्गाकडून - पं.रमेश कानोले ह्यांचे मार्गदर्शन घेत तयार झाले. अशा या शताब्दी वर्षात आणि नांदेड येथील नाट्यसंमेलनाचे एक स्मरण जागते राहील अशी मागणी मी मा.अशोकरावजी चव्हाण सांस्कृतिक कार्यमंत्री यांच्याकडे करीत आहे. कै.शंकररावजी चव्हाण ह्यांनी यशवंत महाविद्यालयात 'संगीत विभाग' सुरु करुन कै.अण्णासाहेबांच्या कार्यांची योग्य दखल घेतली. आपण कै.अण्णासाहेबांच्या शताब्दीनिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात नाटक आणि संगीत विभाग सुरु करावा ही विनंती. यासाठी संबंधितांना कार्यप्रवण करावे. संगीत विषयात पदव्युत्तर अभ्यासाची सोय एस.आर.टी.विद्यापीठात नाही आणि माझ्या माहितीप्रमाणे 'नाट्यशास्त्र' हा विषय पदवी पातळीवर सुद्धा या विद्यापीठातील एकाही महाविद्यालयात नाही. या संमेलनाची एक स्मृती म्हणून आणि नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली येथे मुळातच काहीसे वातावरण उपलब्ध असलेल्या प्रदेशात संगीत आणि नाटक या दोन्ही विषयातील अध्ययन केन्द्रे सुरु झाली तर त्याचा खूपच उपयोग होऊ शकेल.

मित्र हो, हे भाषण संपण्यापूर्वी मला नाट्यरसिकांकडं एक पसायदान मागायचं आहे. माझं हे विधान अतिशय मध्यमवर्गीय स्वरुपाचं आणि मध्यमवर्गीयांना आवडेल असं आहे. त्यामुळं माझ्यावर आक्षेप घेणारांची सोय होईल याची मला कल्पना आहे. पण नाट्यव्यवहारावर मध्यमवर्गीयांची आणि अभिजनांची पकड आहे. त्यामुळं त्यांच्याच परिभाषेत बोलणं मला आवश्यक आहे असं वाटतं. माझ्या या कबुलीमुळं मी एखादा पवित्रा घेतो आहे की काय असाही संशय व्यक्त केला जाऊ शकेल. दोन्हीकडून मी एकाकी पडेल अथवा दोन्ही पक्षांना माझी भूमिका समजून घेणं आवश्यक आहे असेही वाटेल. हे सर्व गृहीत धरुन मी नाट्यरसिकांशी हा संवाद करीत आहे.

मी समन्वयवादी आहे. तडजोडवादी नाही. परंतु समन्वय आणि तडजोड या दोहोंचाही वरवर दिसणारा तोंडवळा सारखाच असतो. सिद्धांत म्हणून तडजोडवादाला कधीच कुणी प्रतिष्ठा देत नाही. म्हणून तडजोडवादी अनेक वेळेला समन्वयवादाच्या भाषेत बोलू लागतात आणि नव्या उमेदीच्या तरुणांचा गोंधळ उडतो. आता मी हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या परिभाषेत सांगू का ? क्रांती आणि प्रतिक्रांती यांचा वरवरचा तोंडवळा सारखाच असतो. त्यामुळं प्रतिक्रांती करणारे क्रांतीच्या परिभाषेत बोलू लागतात. त्यामुळं या दोहोंतील सीमारेषा धूसर होत जातात व अनेकांचा गोंधळ उडतो. त्यामुळेच समान परिभाषेत व्यक्त होणाऱ्या या दोन्ही वादांची सीमारेषा कोणती आहे हे सांगणं मला आवश्यक वाटतं. त्यातच, 'आजची परंपरा कालच्या बंडखोरांनी सुरु केलेली असते आणि आजचे बंडखोर उद्याच्या परंपरेचा पाया घालतात' असं अलंकारिक विधान केलं की उभयपक्ष या विधानाचा स्वत:च्या समर्थनासाठी वापर करु लागतात. हे विधान आदरणीय कै.पु.ल.देशपांडे यांचं आहे आणि ते त्यांनी त्यांच्या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात केलं आहे. त्यामुळे हे विधान स्वीकारण्यापूर्वी अथवा नाकारण्यापूर्वी समन्वय आणि तडजोड यातील सीमारेषा मी अधोरेखित करु इच्छितो. तडजोडीचा अंत:स्थ हेतू आपली सत्ता टिकावी हा असतो. आपले वर्चस्व मजबूत रहावे हा असतो. तर समन्वयवाद परंपरेतला तपशील स्वीकारुन आजच्या जीवनशैलीला घातक ठरेल असा तात्त्विक भाग नाकारत असतो. पाच हजार वर्षांची दीर्घ परंपरा असलेल्या देशात परंपरेला नकार दिला की परंपरा संपते हे समजणे फार भाबडेपणाचे असते. त्यात उपासनेचे स्वातंत्र्य घटनेनेच दिले की परंपरा नाकारण्याची लढाई अधिकच गुंतागुंतीची होते. म्हणून आजच्या वर्तमानातल्या सिद्धांतांना विरोधी जाणारी परंपरा कोणती आणि आजच्या सिद्धांतांना हानी न पोचवणारा पारंपरिक तपशील कोणता हे समन्वयवादी माणसाला उलगडून दाखवावे लागते. एखाद्या प्रेमविवाहात जातीचा अडसर होत असेल तर हा आजच्या वर्तमानातल्या सिद्धांतांना विरोध करणारा परंपरावाद आहे, असे मी मानतो. त्यासाठी कडाडून विरोध करायलाच हवा ही

माझी भूमिका. परंतु एकदा हा आंतरजातीय विवाह मान्य झाला तर लग्न नोंदणी पद्धतीनं करायचं की वैदिक पद्धतीनं हा माझ्या दृष्टीनं तरी तपशीलाचा भाग आहे. हा तपशील स्वीकारणे म्हणजे तडजोड आहे असं मला मुळीच वाटत नाही. समाज हळूहळू हे तपशीलसुद्धा टाळायला शिकतो. त्याला सैद्धांतिक बाजूपेक्षा हा तपशीलच फार महत्त्वाचा वाटत असतो. तपशील सांभाळण्याच्या हट्टापोटी तो वर्तमानातल्या न्यायसमतेच्या भूमिकेचाही विरोधक होऊ शकतो, असं माझं निरीक्षण आहे. म्हणूनच, काय टाळावे, काय स्वीकारण्यासाठी तुटेपर्यंत किती ताणावे यातून जी जीवनदृष्टी तयार होते ती जीवनदृष्टी मला फार महत्त्वाची वाटते. याच जीवनदृष्टीच्या प्रकाशात जीवनाचे आकलन अवलोकन करायचे आणि नाटक लिहायचे ही माझी पद्धती आहे. या माझ्या पद्धतीच्या लेखनाला यापूर्वी आपण जी मान्यता दिली तेच पाठबळ मला आपल्या सारख्या रसिकांकडून मिळत राहो ही माझी अपेक्षा आहे.

धन्यवाद !

**(प्रा.दत्ता भगत)**